बुधवार, १८ ऑक्टोबर २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक - ७४
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) WEDNESDAY 18 OCT. 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-74 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-12 ● PRICE-5

# मीडियाशी कमी बोला, काम करा

## राहुल नार्वेकरांना 'सुप्रीम' इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी विधानसभा अध्यक्षांच्या दिरंगाई प्रकरणावर सुनावणी पार पडली. आमदार अपात्रता प्रकरणावर ठाकरे गट आणि राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वतीने एकत्रित याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. त्याप्रकरणी सुनावणी पार पडली. आजच्या सुनावणीतही सर्वोच्च न्यायालयाने विधानसभा अध्यक्षांवर अत्यंत गंभीर शब्दांत ताशेरे ओढले आहेत. आम्ही विधानसभा अध्यक्षांनी दिलेल्या वेळापत्रकाबाबत असमाधानी आहोत. सॉलिस्टर जनरल यांनी दसऱ्याच्या सुट्टी दरम्यान विधानसभा अध्यक्षांसोबत चर्चा करावी आणि सुधारीत वेळापत्रक द्यावे, असे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. तसेच, अध्यक्षांनी माध्यमांशी कमी बोलावे, कारण कोर्टही टीव्ही पाहत असते, असे म्हणत सर्वोच्च न्यायालयाने अध्यक्ष राहुल नार्वेकर सणसणीत टोला देखील हाणला आहे.**




मंगळवारच्या सुनावणी दरम्यान, विधानसभा अध्यक्षांची बाजू मांडणारे न्यायाधीश सॉलिसिटर जनरल आमदार अपात्रता प्रकरणाच्या वेळापत्रकाचा बचाव करताना दिसले. मात्र, सर्वोच्च न्यायालयाने आम्ही वेळापत्रकाबाबत समाधानी नाही, असे स्पष्ट शब्दांत सांगितले. तसेच, दसऱ्याच्या सुट्टीच्या वेळी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी विधानसभा अध्यक्षांसोबत बसावे आणि नवे वेळापत्रक तयार करुन कोर्टात सादर करावे, जेणेकरुन एक निश्चित कार्यपद्धती सूचित होईल, असे सांगितले.

सर्वोच्च न्यायालयाने अत्यंत गंभीरपणे विधानसभा अध्यक्षांना निर्देश दिले आहेत. शेवटची संधी दिली जात आहे. या दसऱ्याच्या सुट्टीत सॉलिस्टर जनरल अॅड. तुषार मेहता यांच्यासोबत बसून विधानसभा अध्यक्ष नवे वेळापत्रक बनवतील. पुढील सुनावणीपर्यंत हे वेळापत्रक आले नाही तर कोर्ट स्वतः वेळापत्रक देईल, असा इशारा सुप्रीम कोर्टाने दिला आहे. कुठलेही वेळापत्रक अजून निश्चित झालेलं नाही. 30 ऑक्टोबरला पुढची सुनावणी आहे, तेव्हा आपल्याला वेळापत्रक कळेल. तुषार मेहता म्हणाले की, मी अध्यक्षांबरोबर बसतो आणि आम्ही एक वेळापत्रक ठरवतो. तर कोर्ट म्हणाले, आम्ही तुम्हाला एक शेवटची संधी देतो. दसऱ्याच्या सुट्टीत तुम्ही बसा आणि 30 तारखेला परत आमच्याकडे या. जर ते वेळापत्रक आम्हाला मान्य असेल तर ठीक आहे, नाहीतर आम्ही आमचे वेळापत्रक देऊ, असे सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट शब्दांत म्हटल्याचे सिद्धार्थ शिंदे यांनी सांगितलं. आता या प्रकरणावरील पुढची सुनावणी 30 ऑक्टोबर रोजी आहे. आमदार अपात्रता दिरंगाई प्रकरणातील विधानसभा अध्यक्षांच्या विरोधातील याचिकेसंदर्भातील सुनावणीला सर्वोच्च न्यायालयात सुनावणी पार पडली. सुनावणीसाठी सुप्रिया सुळे, जितेंद्र आव्हाड, अनिल परब, अनिल देसाईही कोर्टात उपस्थित होते. विधानसभा अध्यक्षांची बाजू सॉलिसिटर जनरल तुषार मेहता युक्तिवाद केला. तर ठाकरे गट आणि राष्ट्रवादीच्या बाजून कपिल सिब्बल यांनी बाजू मांडली.

**तुम्ही निर्णय घेत नसाल, तर आम्हाला निर्णय घ्यावा लागेल : सर्वोच्च न्यायालय**

विधानसभा अध्यक्षांची बाजू मांडताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी केवळ शिवसेना आमदार अपात्रता प्रकरणी 34 याचिका दाखल झाल्याची माहिती दिली आहे . तसेच, आमच्याकडे अर्ज येत आहेत, सुनावणी सुरू झालेली नसली तरी प्रक्रिया सुरू आहे . तुषार मेहतांचे शांतपणे ऐकून घेतल्यानंतर सरन्यायाधीशांनी शांतपणे उत्तर दिले की, गेल्या सुनावणीत आम्ही तुम्हाला सांगितले होते की, जर तुम्ही निर्णय घेत नसाल, तर त्यासंदर्भातला निर्णय आम्हाला घ्यावा लागेल, तुम्ही जर यामध्ये ठोस वेळापत्रक देत नसाल, यासंदर्भातील याचिका निकाली काढत नसाल, तर आम्हाला नाईलाजाने यामध्ये दखल द्यावी लागेल, असे म्हणत सरन्यायाधीशांनी पुन्हा एकदा विधानसभा अध्यक्षांना गेल्या सुनावणीतील निर्देशांची आठवण करून दिली .

# १५ नोव्हेंबरपर्यंत भूकंप होण्याची शक्यता

## हवामान शास्त्रज्ञ प्रा. जोहरे

आधुनिक केसरी न्यूज

**निफाड :** भूगर्भातील टॅक्टॉनिक प्लेट्सच्या गतिशीलमुळे हवामानात



बदल होत असून दि.१५ नोव्हेंबरपर्यंत महाराष्ट्रासह भारतातील विविध भागांत भूकंपाचे धक्के बसण्याची दाट शक्यता आहे, असे प्राथमिक संशोधन निष्कर्षातून 'सिक्रेट इलेक्ट्रॉनिक उपकरणे' दाखवीत असल्याचा दावा आंतरराष्ट्रीय हवामान शास्त्रज्ञ प्रा.किरणकुमार जोहरे यांनी केला आहे. महाराष्ट्रासह उत्तर भारतात ' ईक्यू क्लाउड' (भूकंप ढग) व धुक्याची निर्मिती होत असून, आगामी काळात महाराष्ट्रात मुंबई, कोकण किनारपट्टी, कोयना धरणक्षेत्रासह गुजरात सीमेवर, कच्छ भागात, हिमालयाच्या पायथ्याशी असलेल्या पट्ट्यात दिल्ली, उत्तराखंड, जम्मू काश्मीर, लेह-लडाख, ईशान्य भारतातील सात राज्ये, नेपाळ, भूतान, अफगाणिस्तान, पाकिस्तान, नेपाळ तसेच उत्तर भारतात भूकंपाचे धक्के बसण्याची शक्यता आहे. दक्षिण भारतात मात्र हा धोका जवळपास अत्यंत कमी किंवा नाही, असे निष्कर्ष देखील प्रा.किरणकुमार जोहरे यांनी बनविलेल्या 'सिक्रेट इलेक्ट्रॉनिक उपकरणां' वर मिळाले आहेत. तापमान चढउतार आणि जमिनीखाली टॅक्टॉनिक प्लेट्सच्या गतिशीलतेने बाष्प बदलांच्या परिणामी भूकंप ढगांची व धुक्याची निर्मिती होत आहे. प्रा.किरणकुमार जोहरे यांनी किमान चार प्रकारच्या भूकंप ढगांचा शोध लावला असून सध्या महाराष्ट्रात तसेच उत्तर भारततही भूकंप ढगांची आणि धुक्याची निर्मिती होत आहे. येत्या काळात ४ ते ८ रिक्टर स्केल भूकंपाचे धक्के बसण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रशासनासह समन्वयाने एकजुटीने 'टीमवर्क' साठी आपत्कालीन व्यवस्था, नागरी संरक्षण दल, एनएसएस, एनसीसी पथकं आदींनी देखील तयार राहण्याची अपरिहार्य व गंभीर आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

# भाजपाने कंत्राटदारांना महाराष्ट्र विकला : शिंदे

आधुनिक केसरी न्यूज

**पंढरपूर :** गोरगरीबांचा आरक्षणाचा हक्क हिरावून घेण्यासाठी भाजपाने सहा बड्या कंत्राटदारांना महाराष्ट्र विकला आहे, अशी टीका काँग्रेस आमदार प्रणिती शिंदे यांनी पंढरपूरमध्ये केली. सरकार खासगीकरण करत आहे याबाबत विचारले गेले असता प्रणिती शिंदे म्हणाल्या, “मला कुणीतरी त्यादिवशी एक धक्कादायक गोष्ट सांगितली. मी एका शिक्षकांच्या कार्यक्रमाला गेले होते. त्यावेळी ते मला म्हणाले कदाचित, शिक्षकांची आमची ही शेवटची पिढी आहे. ते ऐकून माझ्या अंगावर काटा आला. सहा कंत्राटदारांना भाजपाने आणि या सरकारने महाराष्ट्र विकला आहे. बिंदुनामावली त्यामुळे रद्द होणार आहे, आरक्षण रद्द होणार आहे. हे सरकारचे षडयंत्र आहे. या विरोधात आम्ही सगळेच एक मोठा आवाज उठवला आहे.




ऐतिहासिक जेजुरी नवरात्र जयाद्री नवरात्रोत्सव व दसऱ्यासाठी जेजुरीच्या खंडोबा गडाला आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली. यामुळे जयाद्री परिसर झगमगून गेला आहे.
(छायाचित्र : विजयकुमार हरिश्चंद्रे)

# स्त्री समानता आणि सक्षमीकरणाची बीजे भारतीय संविधानातच


## दिशा पिंकी शेख : वाचन प्रेरणा दिनानिमित्त महिला वाचनालयाचा नावीन्यपूर्ण उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

वैजापूर : स्त्री जन्माच्या बीजापासूनच नव्हे तर अंतिम संस्काराच्या क्षणापर्यंत तिच्या रक्षणासाठी कटिबद्ध असणारा महान ग्रंथ भारतीय संविधानच असून तो खरा तिचा मुक्तीदाता आहे, असे प्रतिपादन वैजापूर शहरातील जीवनगंगा सोसायटीतील महिलांच्या मोफत वाचनालयाकडून वाचन प्रेरणा दिनानिमित्त आयोजित महिला सक्षमीकरण आणि वर्तमान स्थिती याविषयावरील व्याख्यानात सुप्रसिद्ध सामाजिक कार्यकर्त्या, कवयित्री तथा वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेश उपाध्यक्षा दिशा पिंकी शेख यांनी प्रतिपादन केले. वैजापूर शहरातील जीवनगंगा सोसायटी येथे गेल्या तीन वर्षांपासून महिलांच्या वाचनालयाकडून विविध सामाजिक उपक्रम सुरू आहेत. त्या अनुषंगाने भारताचे माजी राष्ट्रपती डॉ. ए.पी. जी. अब्दूल कलाम यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अॅड. राफे हसन पीरजादा हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून आर.टी. वाघमारे, राजेश गायकवाड, साहेबराव पडवळ, विलास त्रिभुवन, विलास म्हस्के यांची मंचावर उपस्थिती होती कार्यक्रमाच्या सुरुवातीला समृद्धी महामार्गावर झालेल्या अपघातातील मृतांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. तद्नंतर महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविकात महिला वाचनालयाच्या संस्थापक अध्यक्षा कविता कसबे यांनी वाचनालयाच्या वतीने वर्षभरात साजरे होत असणाऱ्या विविध सामाजिक उपक्रमांची माहिती दिली. आपल्या मनोगतात दिशा पिंकी शेख पुढे म्हणाल्या की, स्त्रीयांवरील अत्याचाराच्या



दिवसेंदिवस घडणाऱ्या निंदणीय घटना या माणुसकीला काळिमा फासणाऱ्या असून जोपर्यंत ती स्वंयनिर्णय घेऊ शकत नाही तोपर्यंत ती सक्षम नाही, असे त्या म्हणाल्या. पाहुण्यांचा परिचय डॉ. आबासाहेब कसबे यांनी करून दिला अध्यक्षीय समारोपात अॅड. राफे हसन यांनी स्त्री सक्षमीकरण फसवे असून एकविसाव्या शतकातही तिच्यावरील अत्याचाराच्या घटना दिवसेंदिवस कमी होण्याऐवजी वाढतच असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुचित कांबळे यांनी तर आभारप्रदर्शन सुर्यकांत काकने यांनी केले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महिला वाचनालयाच्या कविता कसबे, शितल नरवडे, अलका बागुल, प्रज्ञा सोनवणे, छाया जाधव, ज्योती घाडगे, सुलक्षणा जोगदंड, यांच्यासह सागर सोनवणे, सुरेश बागुल, रमेश जाधव, देविदास लाठे यांनी प्रयत्न केले. याप्रसंगी शबाना शेख, अंकुश पठारे, जाकीर पठाण, जीवन पठारे, प्रा. ज्ञानेश्वर खिल्लारी,प्रा. अशोक ठोसर, प्रमोद पठारे, गणेश बोर्डे, दिलीप पठारे, कल्पना शिनगारे, सुप्रिया पठारे,राणी गायकवाड, सुनीता लाठे , शिल्पा किर्तीकर, मनिषा काकणे, माया आढाव, विजय शिनगारे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. विविध पक्षांच्या पदाधिकाऱ्यांनी दिशा पिंकी शेख यांचा सत्कार केला. दिशा पिंकी शेख यांनी तृतीयपंथींचे अनुभव कथन करताना उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू आल्याचे दिसून आले. महिला वाचनालयाच्या अभिनव उपक्रमाची त्यांनी स्तुतीसुमने उधळली.





विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932


# ऐसी अक्षरे रसिके

आधुनिक केसरी

पण काही असो लेखनकलेने जीवनाच्या सर्व क्षेत्रात क्रांती घडवली. त्यामुळेच विविध विचारवंतांचे विचार आपल्यापर्यंत पोहोचले. शिलालेख आले, मृत्युलेख आले. इच्छापत्र आले आणि मृत्युपत्रही आले. प्रेमी जीवांनी एकमेकांना लिहिलेली प्रेमपत्रं आली. रुख्मिणीनं श्रीकृष्णाला लिहिलेलं प्रेमपत्र त्यामुळेच लिहिलं गेलं. चांगदेवांनी ज्ञानेश्वरांना लिहिलेलं ( अर्थातच कोरं ) पत्रही आलं. कविता, लेख, कादंबऱ्या, चरित्रं, आत्मचरित्रं आली. साहित्यविश्व समृध्द झालं. पूर्वी शाळेमध्ये लहान मुलांना अक्षर चांगलं करण्यासाठी कित्ता गिरवायला लावीत. त्यासाठी बोरू किंवा टाकाचा वापर केला जात असे. आजच्या मुलांना बोरू, टाक, दौत इ. गोष्टी दाखवण्यासाठी वस्तुसंग्रहालयातच घेऊन जावं लागेल. पण पूर्वी जे कित्ते गिरवले जायचे त्यावरून एखाद्या व्यक्तीच्या वागण्याबोलण्याचे अनुकरण केले की त्याने अमुक व्यक्तीचा ' कित्ता गिरवला ' असा शब्दप्रयोग रूढ झाला.

आपणही चांगल्या व्यक्तींचा कित्ता गिरवायला हरकत नाही. ज्ञानेश्वर माउली म्हणतात, ' ऐसी अक्षरे रसिके मेळवीन ' आपणही हे अक्षरब्रह्म जपू या. लिहू या, वाचू या. काळाच्या कसोटीवर उतरणाऱ्या, चिरकाल टिकणाऱ्या आणि युगांयुगांचा दीपस्तंभ असलेल्या वांड्मयाला आपण अक्षरसाहित्य म्हणतो. अक्षरसाहित्य हा आपला वारसा आहे, संस्कृती आहे. हे अक्षरब्रह्म आपल्या जीवनाला समृद्धीकडे घेऊन जाणारे आहे. शर्वरीला प्रसिद्ध शास्त्रज्ञ स्टीफन हॉकिंग यांची आठवण झाली स्टीफन हॉकिंग यांना आपल्या आजारामुळे अन्य काही करणं शक्य नव्हतं परंतु आपल्या बोटांच्या हालचालींचा आधार घेऊन आपले विचार ते मांडत होते त्यांची आठवण झाली आणि तिच्या चेहऱ्यावर स्मित झळकलं. सुषमानं दिलेली डायरी शर्वरीनं हातात घेतली आणि अक्षरब्रह्माची आराधना करण्यात ती रंगून गेली.



# आनंदी पहाट

## सामाजिक स्थानाचा विषय आपल्या जिव्हाळ्याचा

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

आपले म्हणून ज्यावेळी आपण एखाद्या व्यक्तीचा अथवा गोष्टीचा मनापासून स्वीकार करतो तेव्हाच त्यांमधील आपला सहभाग वाढत जातो. तुझे-माझे करण्याच्या विचारांमुळे असणारा सहभाग केवळ माझ्या स्वतःशी संबंधित गोष्टींशीच राहतो. आपण सहजीवनाचा एकदा स्वीकार केला तरीही, आपण उगाचच असे करत राहतो. अनेकदा घडणाऱ्या काही घटना, घडामोडी ह्या निसर्गनियमांमुळे सुरु असल्यासारखे वाटते. कदाचित सहभागाचा अभाव असल्याचे ते महत्वाचे कारण असावे. सहभागाचा आनंद हा केवळ त्याची प्रचीती आल्याशिवाय देखील मिळत असतो. आपल्या भागाचे, वाट्याचे, नावचे, कर्तव्याचे भान ठेवून सहजीवनात सहभागी होणे महत्वाचे असते. आनंदप्राप्तीसाठी सकारात्मक वातारणाची निर्मिती करत राहणे गरजेचे असते. आजच्या गतिमान, आधुनिक आणि स्पर्धेच्या युगात अन्न, वस्त्र, निवारा ह्या किमान प्राथमिक गरजांचा विचार करून फक्त चालत नाही, तर बदलत चाललेल्या जीवनमुल्यांचाही स्विकार करावा लागतो. आज आपल्या

आयुष्यातील प्रत्येक सुखात आणि दुःखात आपल्याला शारीरिकदृष्ट्या साथ-सोबत करणारे, मानसिक आधार देणारे,

अंतर्मनाला धीर देणारे, आर्थिकदृष्ट्या सक्षमता देऊ करणारे, सामजिक पत निर्माण करणारे, शैक्षणिक प्रगतीची दिशा दाखवणारे, सामाजिक कौटुंबिक एकोपा टिकवणारे, आपली नातीगोती जपणारे, उणीवा दूर करणारे, आपल्या जाणीवा जपणारे, आपल्या जाणीवांना नेणीवेपर्यंत घेवून जाणारे, आपल्या जीवनात अत्यंत महत्वाची भूमिका

बजावणारे आपले हक्काचे साधन हे दुसरे-तिसरे कोणतेही नसून ते म्हणजे आपल्या सामाजिक बांधिलकीचे नाते असते. आपल्या सर्वांच्या जीवनात अत्यंत महत्वाचा आणि जिव्हाळ्याचा विषय म्हणजे आपले सामाजिक स्थान. ह्या सामाजिक स्थानाचा संबंध थेट आपल्या सामाजिक बांधिलकीशी असतो. एक प्रकारे आपल्या बांधिलकीमुळे सामाजिक कुटुंबाचीच, नवीन नात्यांचीच निर्मिती होत असते. त्या दृष्टीकोनातून सामाजिक बांधिलकीचे महत्व सामाजिक कुटुंबासाठी समजून घेणे जरुरीचे असते.



आधुनिक केसरी

**तेचि माझे गोत्र | सांगे पैस ||**

पाहिले म्या आजी | प्रेम सुख डोळा ||
लावण्य सोहळा अनुपम्य ||१||
पैसच्या भोवती | रमले हे मन ||
हरपले भान | ध्यानी ज्ञाना ||२||
माय ज्ञानेश्वरी | सांगे योगीराज ||
अनंतही आज | डोलताहे ||३||
अंतरीच्या गाठी |सोडविल्या भेटी ||
तुका जगजेठी | सांगताहे ||४||
ज्ञाना-तुका एक | शारदेचे पुत्र ||
तेचि माझे गोत्र | सांगे पैस ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८

# निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

जन्म हाचि विषमकाळ ।जन्म हेंचि वोखटी वेळ ।जन्म हा अति कुश्चीळ ।नर्कपतन ॥ १० ॥पाहातां शरीराचें मूळ ।या ऐसें नाहीं अमंगळ ।रजस्वलेचा जो विटाळ ।त्यामध्यें जन्म यासी ॥११॥अत्यंत दोष ज्या विटाळा । त्या विटाळाचाचि पुतळा ।

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

अज गुरु की छाया पड़े, सद्गुरु पद अधिकार । विद्या पढ़.गुरु नहिं बने, महा कठिन व्यवहार ।।४२।।(स्वर्वेद पंचम मण्डल त्रयोदश अध्याय) ०५/१३/४२

मूळ भाष्याचा मराठी अनुवाद :


जेव्हा उत्तराधिकारींना नित्य अनादि सद्गुरूंचे दर्शन होते तेव्हा सद्गुरूपदाचा अधिकार प्राप्त होतो. उत्तराधिकारींना स्वतः सद्गुरूंचं दर्शन होतं. कोणी विद्या शिकून वाचकज्ञानाने सद्गुरू होऊ शकत नाही. उत्तराधिकारींचं कार्य महान, कठोर आहे, जे कोणी महान त्यागी आणि परम पुरुषार्थीच पूर्ण करतात.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.


# शारदीय नवरात्र (माळ तिसरी)

आधुनिक केसरी

आज आपण देवीला तिसरी माळ चढवणार आहोत. त्रितियेच्या दिवशी मातेने शृंगार मांडला आहे. जरीची सुंदर अशी काठा पदराची नऊवारी



साडी मातेने नेसलेली आहे. कपाळावर लाल कुंकवाचा मळवट भरलेला आहे. भांगात शेंदुर भरलेला आहे. कमरेला कंबरपट्टा बांधलेला आहे. त्यात सोने, चांदी रत्नमाणिक, हिरे, पाचू, पवळे यांचा वापर करून तो कंबरपट्टा बनवलेला आहे. त्यात दैदिप्यमान व आधीच कांतीमान असलेली माता आभूषणामूळे अजून सुंदर दिसत आहे. ठुशी, मोहनमाळ, चपलाहार, कंठाहार, कोल्हापूरी साज, बेलपान, चंद्रसूर्य हार, वज्रटीक नानाविध प्रकारचे अलंकार घातलेले आहेत. डोक्यावरील अंबाड्यात सुवर्ण फुल खोवलेले आहे. सोन्याच्या साखळ्या माणिक मोती घातलेले आहेत. नाकातली नथ तिला खुपचं शोभते आहे. हातात काचेच्या बांगड्या गोठ पाटल्या तोडे यांनी मातेच्या हाताची शोभा वाढली आहे. दंडातील वाकी व बाजूबंदामुळे व कानातील कर्णफूले वेल झुपके हारतुरे शेवंती, कवड्याची माळ गळ्याची शोभा वाढवते आहे. जाईजुई, मोगरा, चाफा, गुलाब शेवंती नाना प्रकारची फुले व हारतुरे यांनी माता विलोभनीय दिसते आहे. तिच्या जवळ भक्तांच्या प्रती प्रेम आहे. कारण ती सर्वांची माता आहे. जगाचे पालनपोषण करण्यासाठी ती दुष्टांना आपल्या आठ हाताने व दोन्ही पायाने त्राही मामा करून सोडते आहे. तर अशी ही महिषासुरमर्दिनी भक्तांना दोन्ही नेत्रांनी व आठ हाताने सर्वांना आशीर्वाद देत आहे, अभय देत आहे आमची अष्टभूजा अंबामाता मिरवत आहे. तेजाची ती अमोघ शक्ती आहे. तुझ्या चरणाशी आमची साधी भोळी भक्ति वाहतो आहोत. कर पावन ही धरणी आई म्हणून आम्ही तुला हाक मारतो. तुझ्या प्रेमाच्या एका कटाक्षासाठी आम्ही भुकेलो आहोत. खात्री आहे माते की भोळ्या भक्तांची भोळी सेवा देईल सुखाचा अनमोल ठेवा लेकरू काही चूकले तर क्षमा करेल. आई म्हणून हाक मारता धावत येईल. प्रीतीची सेवा मान्य करेल सुखाचा अमोल ठेवा देईल अर्पण केली काया माते देईल प्रेमाचा पान्हा परडीत घाल आमच्या तुझ्या मायेचा जोगवा चुकले काही क्षमा कर परडीत घाल तुझ्या मायेचा जोगवा उदं ग अंबे उदं उदं ग अंबे उद आई भवानी जय जय जगदंबे जय जय जगदंबे




सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# भगवंताचे अनुसंधान राखावे

आधुनिक केसरी

फार दिवस वापरून जोडा फाटला की तो कितीही दुरुस्त केला तरी पुनः पुनः फाटतोच. तसेच शरीराचे आहे. शरीर जीर्ण झाल्यावर त्याला काही ना काही तरी होतच राहते. दुरुस्त केलेल्या जोड्यातला एखादा खिळा जर पायाला टोचू लागला तर मात्र त्याला जपावे लागते. तसे, आजारपणामुळे मनाला टोचणी लागली तर जपावे आणि त्याचा मनावर परिणाम होऊ देऊ नये. आपल्या आजाराचा, म्हातारपणाचा आपण फायदा करून घ्यावा. एखादी शहाणी सुगरण बाई ज्याप्रमाणे कोंड्याचा मांडा करते, त्याप्रमाणे आपण आपल्या दुखण्यामधून भगवंताचे अनुसंधान टिकवायला शिकले पाहिजे. अनुसंधानात असलो की प्रपंचात मजा आहे; अडचणी आणि संकटे यांचीसुद्धा मजा वाटेल. पोहायला येणाऱ्या एखाद्याला नुसते सरळ पोहायला सांगितले तर आवडणार नाही. तो उड्या मारील, बुड्या मारील, वाकडातिकडा पोहेल, तसे भगवंताच्या अनुसंधानात राहिले तर प्रपंचाची मजा वाटेल. कोणतीही गोष्ट एकदा ओळखली की मग तिची भिती



वाटत नाही. विषय जोवर ओळखले जात नाहीत तोवरच ते आपल्याला त्रास देतात. याकरिता, ज्या ज्या गोष्टी होत असतात, त्या त्या भगवंताच्या इच्छेनेच होत आहेत, ही जाणीव ठेवून वृत्ती आवरण्याचा प्रयत्न करावा. परमार्थाच्या आड आपले आपणच येत असतो. आपली वृत्ती जिथे जिथे वावरते तिथे भगवंताची वस्ती असते. म्हणून वृत्ती जरी कोणतीही उठली तरी तिथे भगवंताची आठवण केली तर ती चटकन मावळते. आपण नेहमी आपल्या उपास्य देवतेचे स्मरण करीत असावे. त्याच्या पायावर मस्तक ठेवावे, आणि त्याची अनन्य भावाने प्रार्थना करावी की, हे भगवंता, तुझ्या आड येणारे हे विषय तुझ्या कृपेशिवाय नाही दूर होणार. आजवर जगाचा मी अनुभव पाहून घेतला. तुझ्या प्राप्तीशिवाय कशातही सुख नाही असे भासू लागले, तरी वृत्ती आड आल्याशिवाय रहात नाही. माझ्या अज्ञानाने मी आज स्वतःच्याच आड येत आहे. तरी तुझी, म्हणजे पर्यायाने माझीच, ओळख पटावी, आणि त्यात मी तुला पाहावे, हीच माझ्या जीवितातली शेवटची इच्छा आहे. ही इच्छा तुझ्या कृपेशिवाय पूर्ण होणे शक्य नाही. तरी, हे भगवंता, माझे मन तुझ्या चरणी राहो असे कर. यापेक्षा मला जगात दुसरे काहीही नको. आता मी तुझा झालो. यापुढे जे काही होईल ती तुझीच इच्छा मानून मी राहीन, आणि तुझे नाम घेण्याचा आटोकाट प्रयत्न करीन. तू मला आपला म्हण.

आधुनिक
केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
बुधवार, १८ ऑक्टोबर २०२३
adhunikkesari.com Adhunik Kesari

# प्रस्ताव अंतिम टप्प्यात... दीक्षाभूमीचा विकास होणारच : आ. किशोर जोरगेवार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरिअल सोसायटीच्या वतीने पवित्र दिक्षाभुमी येथे धम्मचक्र अनुप्रवर्तन समारंभाचे आयोजन

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पावन पावलाने पवित्र झालेल्या दिक्षाभुमीच्या सर्वसमावेशक विकासासाठी आपले प्रयत्न सुरु आहेत. पहिल्याच अधिवेशनात आपण येथील विकासकामांसाठी 100 कोटी रुपयांच्या निधीची मागणी केली होती. या दरम्यान सरकार बदलली मात्र आपली मागणी बदललेली नाही. येथील विकासासाठी 100 कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आला आहे. तो अंतिम टप्प्यात असून चंद्रपूर येथील दिक्षाभूमिचा विकास होणारच असे प्रतिपादन आमदार किशोर जोरगेवार यांनी केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरिअल सोसायटीच्या वतीने पवित्र दिक्षाभुमी येथे धम्मचक्र अनुप्रवर्तन समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. यावेळी शिक्षक मतदार संघाचे आमदार सुधाकर अडबाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरिअल सोसायटीचे अध्यक्ष अरुण घोटेकर, वामनराव मोडक, डॉ. प्रदीप आगलावे, डॉ अनिल हिरेकर, डॉ. बोकारे आदींची उपस्थिती होती.



यावेळी पूढे बोलताना आ. जोरगेवार म्हणाले कि, नॉलेज ऑफ सिम्बॉल समजल्या जाणा-महामहिम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिक्षा दिलेल्या दिक्षाभुमीचा अपेक्षित असा विकास झाला नाही. मात्र ही परिस्थिती बदलवायची आहे. आपण या दिक्षाभुमीचा विकास करण्याचा संकल्प केला आहे. येथील अभ्यासिकेसाठी आपण 1 कोटी रुपयांचा निधी दिला आहे. यातून अभ्यासिकेचे कामही सुरु आहे. येथे आणखी निधी देण्याची मागणी आता आली आहे. आपली ही मागणीही मान्य आहे. पून्हा एक कोटी रुपये येथे देत असल्याची घोषणाही यावेळी बोलताना त्यांनी केली आहे. ते म्हणाले कि, निवडून आल्या नंतर आपण पहिल्याच अधिवेशनात चंद्रपूरच्या दिक्षाभुमीच्या विकासासाठी एकत्रित 100 कोटी रुपये देण्याची मागणी केली होती. या मागणीचा सातत्याने पाठपुरावा सुरु होता. अखेर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सदर मागणी मान्य करत निधी देण्याची घोषणाही केली आहे. हा प्रस्ताव अंतिम टप्प्यात असल्याचेही ते यावेळी म्हणाले. डॉ. आंबेडकर यांच्या संविधानिक अधिकारामुळेच टोपल्या विकणा-या आईचा मुलगा राज्याच्या सर्वोत्तम सभागृहात पोहचू शकला त्यामुळे आज मिळालेला वाटपाचा अधिकार योग्य त्या ठिकाणी वारण्याचा आपला प्रयत्न असल्याचेही ते यावेळी म्हणाले.

## सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने वृत्तपत्र विक्रेत्यांचा सत्कार

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** येथील सप्तरंगी बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने वृत्तपत्र विक्रेता दिनानिमित्त भावसार चौकातील ज्ञानोबा नरवाडे, सरपंच नगर पवन नगर परिसरातील सुभाष थोरात, तरोडा नाका कामगार चौकातील येथील राजेश लोकरे व सिद्धार्थ नगर, कॅनाल रोडवरील बाबुराव थोरात आणि भारतबाई थोरात तसेच विवेक नगर परिसरातील चेतन चौधरी यांचा सप्तरंगी साहित्य मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सप्तरंगी साहित्य मंडळाचे राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे, वरिष्ठ सल्लागार अनुरत्न वाघमारे, राज्य उपाध्यक्ष पांडूरंग कोकुलवार, कार्याध्यक्ष प्रज्ञाधर ढवळे, सहसचिव मारोती कदम, जिल्हाध्यक्ष रणजित गोणारकर, सटवाजी माचनवार, बालाजी थोटवे, कोंडदेव हटकर, चंद्रकांत चव्हाण, सुभाष पाटील, एकनाथ कार्लेकर, मनोहर संगमवार यांची उपस्थिती होती.

पावसाळा असो की हिवाळा, भल्या पहाटे उठायचं. वर्तमानपत्राचे गठ्ठे ताब्यात घ्यायचे. कोण सायकलवरुन तर कोण चालत घरोघरी वर्तमानपत्र पोहोच करण्याचा नित्यक्रम पाळणाऱ्या वृत्तपत्र विक्रेत्यांचा १५ ऑक्टोबर हा सन्मान दिन म्हणून माजी राष्ट्रपती डॉ. अब्दुल कलाम यांचा जन्मदिवसानिमित्त 'वृत्तपत्र विक्रेता दिन' म्हणून साजरा केला जातो. वृत्तपत्र विक्रेत्यांच्या दृष्टीने हा कष्टाचा गौरव करणारा, अभिमानाचा दिवस आहे. वृत्तपत्र विक्रेत्याला समाजात सन्मान मिळावा अशी अपेक्षाही सप्तरंगी साहित्य मंडळाने व्यक्त केली. इमानेइतबारे व्यवसाय करणारा ह घटक तसा उपेक्षित राहिला आहे.

# उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते आला आला हो.. महोत्सव आला भक्तीगीत सिडीचे विमोचन

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** श्री माता महाकाली महोत्सवानिमित्त तयार करण्यात आलेल्या आला आला हो .. महोत्सव आला या भक्तीगीत सिडीचे राज्याचे उपमुख्य मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपूर येथे विमोचन करण्यात आले. यावेळी श्री महाकाली माता महोत्सव समितीचे अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार, समितीचे सचिव अजय जयस्वाल, माजी नगर सेवक बलराम डोडाणी, अशोक मत्ते, मोहित मोदी आदींची उपस्थिती होती. श्री महाकाली माता महोत्सव समितीच्या वतीने 19 ऑक्टोबरपासून चंद्रपूरात होऊ घातलेल्या श्री माता महाकाली महोत्सवाची



जय्यत तयारी सुरु आहे. यासाठी महाकाली मंदिर पटांगणात भव्य मंडप उभारण्यात आले आहे. सदर महोत्सवाच्या टिझरचे नुकतेच राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आले आहे. सदर महोत्सवात सुप्रसिध्द कलाकार भक्तीमय गीतांची मेजवानी सादर करणार आहे. सदर महोत्सवात 9 हजार 999 कन्यांचे पुजन व भोजन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तर नवरात्री दरम्यान जन्मास आलेल्या कन्यांना श्री महाकाली माता महोत्सव समितीच्या वतीने चांदीचा सिक्का देण्यात येणार आहे. चंद्रपूरची आराध्य दैवत माता महाकालीची महती राज्यभरात पोहोचावी यातुन येथील पर्यटनाला चालना मिळावी हा या महोत्सवा मागचा मुळ उद्देश असल्याचे समितीचे अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार यांनी म्हटले आहे. सदर महोत्सवासाठी श्री महाकाली माता महोत्सव समितीच्या वतीने माता महाकालीच्या भक्तीमय गीतांची सीडी तयार करण्यात आली आहे. यात बोलो नमोस्तुते महाकाली, आला आला हो महोत्सव आला, दृष्ट पापीओं दूर हटो, मुझे भा गया महाकाली का देश, चंद्रपूरची महाकाली गोंधळाला आली, चला करुया जागर अशी भक्ती गीते सदर सिडीमध्ये असणार आहे. दरम्यान राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते नागपूर येथे या भक्तीगीतांच्या गाण्याच्या सिडीचे विमोचन करण्यात आले आहे. सदर गाणी महाकाली भक्तांच्या मुखात बसेल या गाण्यांच्या माध्यमातून माता महाकालीचा जागर राज्यभर होईल असा विश्वास यावेळी श्री महाकाली माता महोत्सव समीतीच्या वतीने व्यक्त करण्यत आला आहे.

# महिलांविषयी राज्य सरकार असंवेदनशील : ॲड. खडसे

आधुनिक केसरी न्यूज

**जळगाव :** महिला संरक्षणात सत्ताधारी सरकार हे अपयशी ठरत आहे. एकट्या बुलढाणा जिल्ह्यात ५५७ मुली बेपत्ता आहेत, यावरून संपूर्ण महाराष्ट्राची परिस्थिती आपण समजू



शकतात. महाराष्ट्रात महिला-मुलींवर अत्याचार वाढताना दिसून येत असून, त्या रोखण्यासाठी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस अपयशी ठरले आहेत, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा ॲड. रोहिणी खडसे-खेवलकर यांनी केली आहे.

जिल्हा परिषदेत महिला बचत गटांसंदर्भात प्रदेशाध्यक्षा ॲड. खडसे-खेवलकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. सध्या महिला आयोगाच्या अध्यक्षा चित्रा वाघ या बुलडाणा जिल्ह्याच्या दौर्यावर आहेत; परंतु त्यांनी बेपत्ता झालेल्या मुलींबाबत चकार शब्दही काढला नाही. यावरून शासन आणि सरकार महिलांबाबत असंवेदनशील आहे, असे दिसून येत असल्याचे खडसे यांनी सांगितले. बेपत्ता ५५ महिला-मुली शोधण्यात पोलिसांना यश आले. मात्र, त्या महिला-मुलींपैकी काहींवर अत्याचार झाले असल्याचे दिसून येत आहे.

जळगाव : महिला संरक्षणात सत्ताधारी सरकार हे अपयशी ठरत आहे. एकट्या बुलढाणा जिल्ह्यात ५५७ मुली बेपत्ता आहेत, यावरून संपूर्ण महाराष्ट्राची परिस्थिती आपण समजू शकतात. महाराष्ट्रात महिला-मुलींवर अत्याचार वाढताना दिसून येत असून, त्या रोखण्यासाठी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस अपयशी ठरले आहेत, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) महिला आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा ॲड. रोहिणी खडसे-खेवलकर यांनी केली आहे. जिल्हा परिषदेत महिला बचत गटांसंदर्भात प्रदेशाध्यक्षा ॲड. खडसे-खेवलकर यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी अंकित यांची भेट घेतली. त्यानंतर त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. सध्या महिला आयोगाच्या अध्यक्षा चित्रा वाघ या बुलडाणा जिल्ह्याच्या दौर्यावर आहेत; परंतु त्यांनी बेपत्ता झालेल्या मुलींबाबत चकार शब्दही काढला नाही. यावरून शासन आणि सरकार महिलांबाबत असंवेदनशील आहे, असे दिसून येत असल्याचे खडसे यांनी सांगितले.



## महागाईचे सावट कायम

आधुनिक केसरी

रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीने (एमपीसी) नुकताच रेपो रेट ६.५० टक्के कायम ठेवण्याचा निर्णय घेतला आहे. एकीकडे या दरात वाढ न झाल्यामुळे काहीसा दिलासा मिळाला असला, तरी तो अद्याप कमीही झालेला नाही. त्यामुळे महागाईची टांगती तलवार आणखी काही काळ राहणार असल्याचे हे निदर्शक आहे. काही प्रमुख आर्थिक व नैसर्गिक घटक या अनिश्चिततेला कारणीभूत ठरले आहेत. देशाच्या विविध भागांमध्ये झालेला अपुरा पाऊस, खरिपाच्या पेरण्याचे क्षेत्र कमी झाल्याने उत्पादनात घट होण्याची शक्यता, धरणांतील अपुरा पाणीसाठा आणि जागतिक पातळीवर अन्नधान्य-इंधनाच्या दरांबाबतची अनिश्चितता यांमुळे ही अस्थिरता कायम असल्याचे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी म्हटले आहे. या सर्व घटकांचा परिणाम चलनवाढीवर होत असल्याने त्यावर रिझर्व्ह बँक बारकाईने लक्ष ठेवून आहे. यंदा 'एल निनो'चा फटका बसून देशातील मान्सूनचे प्रमाण सरासरीपेक्षा घटणार, असा अंदाज पूर्वीच व्यक्त झाला होता. हवामानशास्त्र विभागाच्या माहितीनुसार, यंदा देशातील सात उपविभागांमध्ये, म्हणजे सुमारे १८ टक्के क्षेत्रावर कमी पाऊस झाला आहे. केरळ, दक्षिण कर्नाटक, ईशान्य प्रदेश, बिहार, झारखंड, पश्चिम बंगाल, त्रिपुरा, मिझोराम, मणिपूर आणि नागालँड या राज्यात पाऊस कमी झाला. मान्सूनच्या परतीचा प्रवास सुरू असताना, म्हणजे एक ऑक्टोबर रोजी देशात सरासरीच्या ९४.४ टक्के इतका पाऊस झाला. संकेतानुसार, हा 'सामान्य' पाऊस म्हणून गणला जात असला, तरी मुळात उशिरा झालेले आगमन आणि नंतरही पावसाने ओढ दिल्याने काही पिकांच्या पेरण्या गेल्या वर्षीच्या तुलनेत घटल्या आहेत. त्यामध्ये डाळींचे क्षेत्र १२८.४९ लाख हेक्टरवरून १२२.५७ लाख हेक्टरपर्यंत घटले आहे. तेलबियांचे क्षेत्र १९६.०८ लाख हेक्टरवरून १९२.५१ लाख हेक्टरपर्यंत आणि कापसाचे क्षेत्र १२७.५७ लाख हेक्टरवरून १२३.४२ लाख हेक्टरपर्यंत घटले आहे. दुसरीकडे, ऊस आणि भाताच्या क्षेत्रात वाढ झाली आहे. उसाचे क्षेत्र ५५ लाख हेक्टरवरून ५९ लाख हेक्टर आणि भाताचे क्षेत्र ४०० लाख हेक्टरवरून ४११ लाख हेक्टरपर्यंत वाढले आहे; तसेच श्रीअन्न, म्हणजे भरडधान्याच्या क्षेत्रातही १८३ लाख हेक्टरवरून १८६ लाख हेक्टरपर्यंत वाढ नोंदविण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर डाळी, तेलबिया आणि कापसाच्या उत्पादनावर परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. त्याबरोबरच रशिया-युक्रेन आणि नुकताच सुरू झालेला गाझा पट्टीतील संघर्ष यांचा धान्याचा पुरवठा आणि इंधनाच्या दरांवर परिणाम होऊन महागाईत वाढ होण्याची भीती आहे.

## इस्रायल- गाझा वाद



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**गेल्या दहा दिवसांपासून इस्रायल आणि कट्टरवाद्यांमध्ये वाढलेल्या तणावानंतर गाझा पट्टीत पुन्हा संघर्ष पेटला आहे. पॅलेस्टिनी दहशतवादी संघटना हमासने इस्रायलवर केलेल्या हल्ल्यानंतर दोन्ही बाजूंच्या शेकडो लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांच्या युद्धाच्या घोषणेनंतर इस्रायलचे लष्कर आणि हवाई दल हमासच्या दहशतवाद्यांना प्रत्युत्तर देत आहेत. गाझा पट्टीवर सातत्याने रॉकेट हल्ले होत असून, त्यावर इस्रायल नेहमीच आक्रमक राहिला आहे. इस्रायल आणि पॅलेस्टाईन अनेक दशकांपासून संघर्ष करत आहे. गेल्या दहा दिवसांपासून इस्रायल आणि कट्टरवाद्यांमध्ये वाढलेल्या तणावानंतर गाझा पट्टीत पुन्हा संघर्ष पेटला आहे.**

पॅलेस्टिनी दहशतवादी संघटना हमासने इस्रायलवर केलेल्या हल्ल्यानंतर दोन्ही बाजूंच्या शेकडो लोकांना आपले प्राण गमवावे लागले आहेत. इस्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांच्या युद्धाच्या घोषणेनंतर इस्रायलचे लष्कर आणि हवाई दल हमासच्या दहशतवाद्यांना प्रत्युत्तर देत आहेत. गाझा पट्टीवर सातत्याने रॉकेट हल्ले होत असून, त्यावर इस्रायल नेहमीच आक्रमक राहिला आहे. इस्रायल आणि पॅलेस्टाईन अनेक दशकांपासून संघर्ष करत आहे.

हमासच्या हल्ल्याने परत एकदा गाझा चर्चेत आला. गाझा पट्टी मधील हा संघर्ष जूनाच असून जुन्या संघर्षाची ही नवी ठिणगी आहे.

काय आहे गाझा पट्टी?

गाझा पट्टी हा इस्रायल, इजिप्त आणि भूमध्य समुद्राच्या मधोमध असलेला एक छोटासा भूभाग आहे, जो जगातील सर्वात दाट लोकवस्तीचा भाग म्हणूनही ओळखला जातो. हमास ही दहशतवादी इस्लामिक पॅलेस्टिनी संघटना गाझामधूनच इस्रायलवर हल्ले करत आहे. गाझा पट्टी हे अंदाजे दहा किलोमीटर रुंद आणि ४१ किलोमीटर लांबीचे क्षेत्र आहे आणि २ दशलक्षाहून अधिक लोकांचे निवासस्थान असलेले ठिकाण आहे.याचा अर्थ प्रति चौरस किलोमीटर सरासरी सुमारे ५,५०० लोक राहतात. इस्रायलबद्दल बोलायचे झाल्यास, येथे सरासरी लोकसंख्येची घनता सुमारे ४०० लोक प्रति चौरस किलोमीटर आहे, ज्यावरून गाझा किती दाट लोकवस्ती आहे हे समजू शकते.

गाझा पट्टीत राहणारे लोक पॅलेस्टिनी आहेत. येथे राहणाऱ्या लोकांमध्ये मूळ रहिवासी आणि निर्वासितांचा समावेश आहे. १९४८ मध्ये इस्रायलची स्थापना झाल्यानंतर आणि त्यानंतर इस्रायल आणि पॅलेस्टिनी यांच्यातील लष्करी संघर्षानंतर निर्वासित गाझामध्ये पळून गेले. येथे राहणारे बहुतेक लोक उत्तरेकडे, विशेषतः गाझा शहरात राहतात. येथील लोकसंख्या खूपच तरुण आहे, सुमारे ४०% लोकसंख्या १५वर्षांपेक्षा कमी वयाची आहे.

पॅलेस्टिनी प्रदेशांमध्ये गाझा पट्टी आणि इस्रायली-व्याप्त वेस्ट बँक समाविष्ट आहे. वेस्ट बँक पूर्व जेरुसलेमची सीमा इस्रायल, मृत समुद्र आणि जॉर्डनला लागून आहे. गाझा पट्टी पूर्णपणे वेगळी आहे. खूप मोठी आहे परंतु कमी दाट लोकवस्ती आहे. पॅलेस्टाईन लिबरेशन ऑर्गनायझेशन (पीएलओ) मधील सर्वात मजबूत गट फतह पक्षाचे राज्य आहे, जो इस्रायलचा अस्तित्वाला मान्यता देतो आणि बहुतेक पाश्चात्य देश याला पॅलेस्टिनी लोकांचे प्रतिनिधित्व करणारा म्हणून ओळखतात. जून १९६७ च्या युद्धानंतर इस्रायलने पुन्हा गाझा पट्टी ताब्यात घेतली. त्यानंतर २५ वर्षे इस्रायलने आपला ताबा कायम ठेवला, परंतु डिसेंबर १९८७ मध्ये गाझामधील पॅलेस्टिनी लोकांमध्ये दंगली आणि हिंसक संघर्षाने बंडाचे रूप धारण केले. सप्टेंबर २००५ मध्ये इस्रायलने त्या क्षेत्रातून माघार घेतली आणि गाझा पट्टीचे नियंत्रण पॅलेस्टिनी प्राधिकरण सुरत (PA)ला दिले. त्यानंतर इस्रायलने क्षेत्र संरक्षण आणि हवाई गस्त सुरू ठेवली.

**गाझावर कोण राज्य कोण राज्य करतो?**

गाझा पट्टीवर २००७ पासून दहशतवादी इस्लामिक गट हमासचे राज्य आहे. हमासने इस्रायलसोबतची शांतता प्रक्रिया नाकारून आपल्या सनदेत इस्रायलचा नाश करण्याचे आवाहन केले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हमासचे अतिरेकी गाझामधून इस्रायलच्या भूभागावर रॉकेट हल्ले करत आहेत. मात्र, ७ ऑक्टोबरपासून सुरू झालेल्या या हल्ल्यात आत्तापर्यंत हाणामारी झाली आहे. हा सर्वात भीषण हल्ला असल्याचे बोलले जात आहे. २००७ मध्ये हमासने गाझा पट्टी ताब्यात घेतल्यापासून इस्रायलने याकडे "शत्रूचा प्रदेश" म्हणून पाहिले आहे आणि मोठ्या प्रमाणात तो बंद केला आहे. इस्रायलचे पाणी, जमीन आणि हवेवर नियंत्रण आहे. तेव्हापासून हमास इस्रायलवर 'सेल्फ डिफेन्स' हल्ले करत आहे. यामुळे भूतकाळात २००८-०९, २०१२, २०१४ आणि २०२१ मध्ये इस्रायली सैन्यासोबत चार मोठे लष्करी संघर्ष झाले आहेत.

बहुसंख्य लोकसंख्या गरीब

इजिप्त या एकमेव शेजारी देशानेही इस्रायलच्या गाझा नाकेबंदीला पाठिंबा दिला होता. परिणामी, आर्थिक अलिप्ततेमुळे परिस्थिती आणखीनच बिकट झाली आणि लोकसंख्येचा एक मोठा वर्ग अजूनही गरिबीत जगतो. १५ ते २४ वयोगटातील सुमारे ४०% रहिवासी बेरोजगार आहेत. तरुण लोकसंख्येमध्ये गरीबी आणि संभावना आणि संधींचा अभाव ही कारणे हमासला सतत पाठिंबा मिळत आहे.

इस्रायल आणि गाझा दरम्यान, लोकांच्या हालचालीसाठी एक सीमा (इरेझ) आणि मालासाठी एक सीमा आहे (केरेम शालोम/सुफा). इस्रायल किंवा इजिप्तमधून गाझा पट्टीत माल घेऊन जाणाऱ्या ट्रकद्वारे त्याचा वापर केला जातो. रफाला इजिप्तमध्ये जाण्याचा मार्ग देखील आहे. गाझामध्ये शस्त्रास्त्रांची वाहतूक रोखण्यासाठी इस्रायलकडून वस्तूंच्या आयातीवर कडक नियंत्रण ठेवले जाते. इजिप्तची सीमा देखील अनेकदा रोखली जाते जेणेकरून हमास बोगद्यांच्या जाळ्यातून मालाची तस्करी करण्याचा प्रयत्न करू शकेल.



## निष्पाप लोकांचा बळी



माधव पि. बैलकवाड
संपर्क क्र. 8080471642

आधुनिक केसरी

**हमासच्या आतंकवाद्यांनी इस्रायलवर अटॅक केल्याने हजारो नागरिक ठार झााले. याचे प्रायचित्य हमासला व मदत करणाऱ्या राष्ट्रांना तर भोगावेच लागेल सोबतच याची जास्त झळ निष्पाप नागरिकांना सुध्दा भोगावी लागत आहे. हमासने इस्रायलवर जो हल्ला केला त्याचे समर्थन होऊ शकत नाही. अशा परिस्थितीत इस्रायलने जशास तसे उत्तर देण्याची शपथ घेतली आहे व प्रत्येक गोष्टीचा सामना करण्यासाठी कंबर कसली आहे. त्यामुळे इस्रायलचे एकच लक्ष आहे ते म्हणजे हमास आतंकवाद्यांचा जळा-मुळासकट उपडुन फेकने. 7 आक्टोंबर 2023 ला हमास आतंकवाद्यांनी अचानक इस्रायलवर कायरतापुर्वक हल्ला केला यात हजारो निरपराध नागरिक मारल्या गेले.**

यामुळे इस्रायल आगबबुला झालेला आहे. त्यामुळे इस्रायलने पन केला आहे की कोणत्याही परिस्थितीत हमासच्या आतंकवाद्यांचा खात्मा करने गरजेचे आहे. जर त्यांच्या मदतीला कोणतीही आतंकवादी संघटना किंवा देश येत असेल त्यांनी इस्रायलशी दोन-दोन हात करण्यास तयार रहावे. त्याच पध्दतीने इस्रायलने हमासच्या गाजामधील कॅम्पवर लगातार अंधाधुंद मिसाईल हल्ले चढविले आहे व यात हमासच्या अनेक टॉप कमांडरांचा खात्मा सुध्दा झाला आहे. परंतु या भयावह संघर्षात निष्पाप लोकांचा व मुलांचावृध्दांचा, अनेक कुटुंबांचा बळी जात आहे ही अत्यंत दुःखद बाब आहे.इस्रायलवर हल्ला करणारा हमास हा अलकायदापेक्षा घातक असल्याचे अमेरिकेचे म्हणने आहे. कारण हमास आतंकवाद्यांनी इस्रायलच्या एक हजारपेक्षा जास्त नागरिकांची हत्या केली, अशा परिस्थितीत लोकशाहीची जतन करणाऱ्या संपूर्ण देशांनी इस्रायलच्या पाठीशी खंबीरपणे उभे रहायला पाहिजे.कारण आतंकवाद हा शब्द कोणताही देश पसंद करीत नाही व करणार नाही. त्यामुळे आतंकवाद ही जगाच्या विकासाला व सर्वसामान्यांच्या दृष्टिकोनातुन लागलेली मोठी किड आहे हे आपण अनेकदा पाहिले आहे. त्याचा नायनाट सर्वांनीच मिळुन करायला हवा. इस्रायलचा गेल्या अनेक वर्षांपासून पॅलेस्टाईन व जेरूसलेम हा वाद सुरू आहे याचाच फायदा हमासचे आतंकवादी घेत आहेत. इस्रायलने हमासच्या आतंकवाद्यांची जमीनीपासुन तर आकाशापर्यंत डेडलाईन्स निश्चित केली आहे.म्हणजेच हमासच्या आतंकवाद्यांची व त्यांच्या मदतीला येणाऱ्या आतंकवाद्यांची मृत्यूंची लकीर खीचली असल्याचे दिसून येते. याकरीता इस्रायलने तयारी म्हणून उत्तर गाजातून पॅलेस्टाईन नागरिकांना गाजा खाली करण्याचे आदेश दिले आहेत. जेणेकरून हमासचा खात्मा सहज करता यावा व निरअपराध नागरिकांचा बळी जावु नये. हमासच्या आतंकवाद्यांचा खात्मा करण्यासाठी



जो.बायडेन यांनी इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू आणि पॅलेस्टिनीचे अध्यक्ष मेहमूद अब्बास यांनी आतंकवाद्यांचा खात्मा करण्यास एकमेकांचा सहयोग घेणे आवश्यक असल्याचे म्हटले आहे. हमाससोबत थेट युद्ध आणि लेबनॉनमधील दहशतवादी संघटना हिजबुल्लासोबत संघर्षादम्यान इस्रायलचे पंतप्रधान बेंजामिन नेतान्याहू यांनी ठणकावून सांगितले की हमासला नेस्तनाबूत केल्याशिवाय शांत बसणार नाही.कारण हमास इस्रायली नागरिकांचा मोठा हत्यारा आहे.आतापर्यंत इस्रायलच्या हल्यात 2500 पॅलेस्टिनींचा मृत्यू झाल्याचे सांगितले जाते ही अत्यंत दुःखद आणि चिंताजनक बाब आहे.गाजावर हल्ले करतांना इस्रायलने संपूर्ण नागरिकांच्या जिवाची काळजी घ्यावी व जेनेकरून आबालवृद्ध, मुलं, विद्यार्थी व अन्य निरअपराध नागरिकांचा बळी जाणार नाही याची जातीने दक्षता घेतली पाहिजे. परिस्थिती अत्यंत बिकट आहे. परंतु आतंकवाद्यांचा खात्मा सुध्दा आवश्यक आहे. यासाठी संयुक्त राष्ट्र संघाने पुढाकार घेतला पाहिजे व आतंकवाद्यांचा व आतंकवादी संघटनांचा खात्मा करण्यासाठी समोर यायला पाहिजे व या युद्धामध्ये निष्पाप लोकांच्या सर्वतोपरी मदतीला धावून गेले पाहिजे. आश्चर्याची गोष्ट आहे की जे अरब देश पॅलेस्टिनींचे समर्थ करीत आहेत ते संपूर्ण देश पॅलेस्टिनीं नागरिकांना शरण देण्यास तयार नाही ही अत्यंत चिंताजनक बाब आहे.इस्रायल शेजारच्या देशांच्या आतंकवादी संघटनांशी घेरला गेला आहे. यात गाजा येथील हमास व इस्लामिक जिहाद,मिस्त्रमधील आतंकवादी संघटना मुस्लिम ब्रदरहुड, लेबनॉन मधील आतंकवादी संघटना हिजब्बुल्ला, सिरियातील आय एस आय एस( अलकायद) इत्यादी आतंकी संघटनांशी इस्रायलला सामना करावा लागु शकतो. म्हणजे इस्रायल समोर मोठे आव्हान सुध्दा आहे. गाजामधील निष्पाप लोकांचा बळी जाण्याचे भयावह दृश्य पहाता हमास-इस्रायल संघर्षात निष्पाप लोकांचा बळी जावू नये हिच ईश्वरचरणी प्रार्थना.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# अय्युब पठाण यांची जिल्हा प्रतिनिधी म्हणून नियुक्ती

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** नागपूर येथुन मराठी साहित्य विषयी प्रकाशित होणारे शब्दशिल्प साहित्य या डिजीटल वृत्तपत्राचे छत्रपती संभाजीनगर जिल्हयासाठी प्रसिध्द साहित्यिक अय्युब पठाण लोहगांवकर यांची संपादक कलामखान यांनी जिल्हा प्रतिनिधी म्हणून नियुक्ती केलेली आहे.
मराठी साहित्यिकांना त्यांच्या साहित्य लेखनासाठी हक्काचे व्यासपीठ मिळावे यासाठी शब्दशिल्प साहित्य या वृत्तपत्राची निर्मिती केलेली आहे. यामध्ये पुस्तक प्रकाशन, साहित्य पुरस्कार, समिक्षा लेखन, आणि दर्जेदार कथा- कविता प्रकाशित केले जातात. अय्युब पठाण हे मराठवाड्यातील प्रसिध्द बालसाहित्यिक आणि ग्रामीण साहित्यिक असून आतापर्यंत त्यांची चार कथासंग्रह आणि आठ कवितासंग्रह प्रकाशित असून त्यांची, "पाणपोई" ही कविता बालभारतीच्या इयत्ता सहावीच्या अभ्यासक्रमात समाविष्ठ आहे. पठाण यांची जिल्हा प्रतिनिथी नियुक्त झाल्याने साहित्यक्षेत्रात त्यांचे अभीनंदन होत आहे.
साहित्यिकांनी आपल्या साहित्याविषयी माहिती अय्युब पठाण यांच्या ९७६४३५०३७४ या क्रमांकावर पाठवावी, असे आवाहान करण्यात येत आहे.

# आदिवासी संघटनांचे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज

**बोईसर :** वाढवण बंदर रद्द करण्याच्या मागणी सह इतर अनेक मागण्यांसाठी मुंबई अहमदाबाद महामार्गावरील मनोर जवळील जव्हार फाटा येथे आदिवासी संघटनांच्या वतीने महामार्ग रोको आंदोलन करण्यात आले. कार्यकर्त्यांनी महामार्ग रोखून धरल्याने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.



# अडीच हजार रुग्णांची मोफत तपासणी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** भानुदासराव चव्हाण प्रतिष्ठान व एमजीएम रुग्णालय यांच्या संयुक्त विद्यमाने खुलताबाद तालुक्यातील नागरिकांसाठी गुडघे दुखी व कंबर दुखी आजारासंदर्भात वेरुळ येथील विश्वकर्मा मंदिरात 11 ते 15 ऑक्टोबर दरम्यान मोफत तपासणी शिबीर आयोजित करण्यात आली होती. चार दिवसांत तालुक्यातील 2500 हुन अधिक रुग्णांनी या शिबिराचा लाभ घेतला असल्याचे भानुदासराव चव्हाण प्रतिष्ठानचे अध्यक्ष आ. सतीषभाऊ चव्हाण यांनी सांगितले. शिबिराच्या पहिल्या दिवशी एक हजार, दुसऱ्या दिवशी 500, तिसऱ्या दिवशी 600, चौथ्या दिवशी 400 हुन अधिक रुग्णांची प्राथमिक तपासणी करण्यात आली. यामधील जवळपास 950 हुन अधिक रुग्णांचे मोफत एक्स रे काढण्यात आले होते. मुंबई येथील प्रसिद्ध अस्थीरोग तज्ञ डॉ.अबी तुरब चुनिया यांच्या प्रमुख उपस्थितीत आज (दि.15) सदरील शिबिराचा समारोप झाला. याप्रसंगी शिबिराचे आयोजक आमदार सतीश चव्हाण, एमजीएमचे अधिष्ठाता डॉ.आर.बी.बोरा, राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्षा स्वाती कोल्हे, तालुकाध्यक्ष अनिल चव्हाण, महेश उबाळे, सुनीता आहेवाड, गजानन फुलारे, भिमराव नलावडे, अजीम मनियार, भगवान कामठे, प्रकाश नलावडे, ज्ञानेश्वर दुधारे, विनोद जाधव, अजिनाथ साळुंके, ज्ञानेश्वर मातकर, रावसाहेब फुलारे, नईम पटेल, नानासाहेब चंद्रटीके, केशव जाधव, आदीब शेख, रियाज शेख, हरिदास राठोड, भाऊसाहेब जाधव, मदन राठोड, नईम शहा, जावेद पटेल, इब्राहिम शहा, प्रवीण निकम, अक्षय नलावडे, इरफान पठाण, अक्षय नलावडे आदींची उपस्थिती होती.याप्रसंगी बोलतानाआ.सतिष भाऊ चव्हाण म्हणाले की, आज असंख्य नागरिकांना गुंडघे दुखी, कंबर दुखी अशाा विविध आजारांना सामोरे जावे लागत आहे. या आजारांवर उपचारसाठी लागणारा लाखो रूपयांचा खर्च सर्वसामान्यांच्या आवाक्याबाहेर गेला आहे. ग्रामीण भागातील जनतेची आरोग्य समस्येमुळे होणारी परवड टाळता यावी म्हणून गुडघे दुखी व कंबर दुखी आजारासंदर्भात हे मोफत तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते. या शिबारातील गरजू रुग्णांवर पुढील उपचार देखील मोफत करणार असल्याचे आ.सतीश चव्हाण यांनी सांगितले. डॉ.आर.बी.बोरा यांनी रुग्णांनी आजार अंगावर न काढता वेळेवर उपचार करण्याचा सल्ला दिला. तर डॉ.अबी तुरब चुनिया यांनी आ.सतीश चव्हाण यांनी आयोजित केलेल्या या शिबरीचे कौतुक करत यापुढे देखीलरुग्ण सेवा देण्यासाठी उपलब्ध राहू असे उपस्थित रुग्णांना आश्वस्त केले.

# संशयितास जामीन मंजूर

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** दोंडाईचा येथे सुरत वरून आलेल्या मिरची व्यापाऱ्यास जब्बर मारहाण व जिवे ठार मारण्याच्या प्रयत्नाबाबत प्रकरणी दिनांक २४/०७/२०२३ रोजी दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे तीन संशयीतांन विरूध्द भा.द.वि कलम 307,327, 120ब, 324,504,506 सह आर्मस ॲक्ट 3/25,7/27 अन्वेय गुन्हा दाखल करण्यात आले होते व याचं गुन्ह्यात दोंडाईचा पोलिसांनी संशयीतास दि. 31/08/2023 रोजी सदर प्रकरणात अटक केली होती व दिनांक 16/9/2023 रोजी आरोपीचे वकील ॲड. ऋतुराज दिगंबर वाघ यांनी धुळे येथील जिल्हा न्यायालयात सदर आरोपीचा जामीन अर्ज दाखल केला होता व त्या जामीन अर्जावर सुनावणी होऊन ॲड. ऋतुराज दिगंबर वाघ यांनी केलेल्या जोरदार युक्तिवादामुळे सदर जामीन अर्ज मा. न्यायालयाने दिनांक 04/10/2023 रोजी मंजूर करून सदर गुन्ह्यातून आरोपीचा सशर्त जामीन मंजूर केलेला आहे. त्यांना ॲड. निखिल भट यांचे सहकार्य लाभले.

# अमली पदार्थ विरोधी जनजागृतीतून प्रत्युत्तर

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** शहर आणि परिसरात मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ पोलिसांच्या हाती लागल्यानंतर या तस्करांशी राजकीय नेत्यांच्या असणाऱ्या संबंधांवरून आरोप-प्रत्यारोपाचे सत्र सुरू आहे. ठाकरे गटासह काँग्रेसने शहरातील अंमली पदार्थ तस्करीला सत्ताधाऱ्यांना जबाबदार धरत या विरोधात २० ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्याची तयारी सुरू केली आहे. या पार्श्वभूमीवर, सत्ताधाऱ्यांनी विरोधकांना प्रत्युत्तर देण्याची तयारी केली आहे. अवैध धंद्यांवर कठोर कारवाईचे निर्देश पालकमंत्री दादा भुसे यांनी दिले आहेत. पाठोपाठ तरुणाई अंमली पदार्थांच्या आहारी गेल्याचे उघड झाल्याने केवळ कारवाईवर न थांबता या संदर्भात व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. अंमली पदार्थ जनजागरण चळवळी संदर्भात मंगळवारी पालकमंत्री भुसे यांच्या उपस्थितीत बैठक होत आहे.
अंमली पदार्थ माफिया ललित पाटीलने पोलिसांना गुंगारा दिल्यानंतर या तस्कराचे कुणाशी संबंध होते, यावरून शिंदे गट आणि ठाकरे गटाकडून परस्परांना लक्ष्य केले जात आहे. ठाकरे गटाचे नेते खासदार संजय राऊत यांनी थेट भुसे यांच्यावर आरोप करीत त्यांच्याकडून पुरावे नष्ट केले जाण्याची भीती व्यक्त केली. शहरातील अंमली पदार्थ तस्करी, शहराची होणारी अधोगती याला राज्याचे गृहमंत्री देवेंद्र फडणवीस, पालकमंत्री दादा भुसे, अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ हे जबाबदार असल्याचा आरोप करीत निषेधार्थ ठाकरे गटातर्फे २० ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे. काँग्रेसने नाशिक बचाओ, ड्रग हटाओ मोहीम हाती घेतली आहे. या घटनाक्रमाच्या पार्श्वभूमीवर, विरोधकांना प्रत्युत्तर देण्यासाठी सत्ताधाऱ्यांनी अंमली पदार्थ विरोधी जनजागृती चळवळीच्या उपक्रमाची मुहूर्तमेढ रोवली. या संदर्भात पालकमंत्री दादा भुसे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक होणार आहे. पालकमंत्री भुसे यांनी अवैध धंदेवाल्यांची गय करू नका, असे आधीच सूचित केले आहे. मंत्री भुसे यांनी काही दिवसांपूर्वी अंमली पदार्थांबाबत माहिती मागवली होती. अवैध धंदे चालकांना पाठीशी घातले जाणार नाही. असा इशारा भुसे यांनी दिला आहे.

# रत्नाळी गावात रसायनमिश्रित शिंदीची भट्टी

## आरोग्य धोक्यात : उत्पादन शुल्क पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष

आधुनिक केसरी न्यूज

**बाबुराव गोनारकर**


**धर्माबाद :** शहरातील रत्नाळी येथे कोणतीही परवानगी न घेता, देगलुर येथील शिन्दी भठ्ठी चालकांनी रत्नाळी गावात रासायनिक मिश्रीत शिन्दी भठ्ठी चे दुकान टाकल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. एवढेच नसुन शिन्दी पिल्याने अनेक तरुण दगावले गेले असल्याचे उदाहरण असताना ही उत्पादन शुल्क, पोलिस प्रशासनाचे दुर्लक्ष का ? असा प्रश्न संतापुन नागरिकांतून ऐकण्यास येत आहे.
देगलूर तालुक्यातील शहापूर येथील एक शिंदी भठ्ठी चालक, उत्पादन शुल्क विभाग च्या आशिर्वादाने देगलुर येथील शिन्दी भठ्ठी धर्माबाद ला स्थलांतर करुन रत्नाळी येथे बेकायदेशीर रासायनिक मिश्रीत शिन्दी भठ्ठी थाटली. रासायनिक नशेली गोळ्या,केमीकल टाकुन रसायन मिश्रीत शिन्दी तयार केले जात आहे.या अवैध अड्डातुन गल्लीबोळीत



रासायनिक शिन्दीचे दूकाने थाटले जात आहे. रासायनिक शिन्दीने यूवक ,महिला,पुरुष व्यसनाधिन तर बनत आहेत उलट आरोग्याला घातक ठरत आहे.व्यसनाधिनवाल्याना व्यसन अधिक वाढल्याने शिन्दी पिल्याशिवाय जमत नाही. लहान लहान बालके सुध्दा शिन्दी च्या आहारी जात आहे. शिन्दी आधिक पिल्याने रस्त्यावर शिन्दी पिणारे लोळतात पंधरा ते विस रुपयेला एक बाटल या भठ्ठीतुन विक्री केली जाते. अनेकांचे संसार उद्धवस्त होत आहेत. पण येथील पोलिस प्रशासनास दिसत नाही का ? रत्नाळीत गेल्या आठ महिन्यांपासून शिन्दी चा अड्डा थाटला असल्याने अधिक नागरीक व्यसनाधीन बनत आहे.एकीकडे व्यसन मुक्ती चे जनजागृती केले जाते तर दुसरीकडे प्रशासन बेकायदेशीर रासायनिक मिश्रीत शिन्दी अड्डा टाकण्यास परवानगी देतात याबद्दल सुज्ञान नागरीकांनी पोलिस प्रशासन बद्दल संताप व्यक्त होत आहे.या शिन्दी मुळे हाडे ठिसुळ होणे,गुढगे दुकणे, वयोमर्यादा घटणे, पोट फुगणे, सुस्थ राहणे आदी आजार होत आहे. एवढेच नसुन शिन्दी मुळे अनेक तरुण दगावले असल्याचे उदाहरण आहेत.
एवढे घातक रासायनिक बनावट शिन्दी रत्नाळी त बेकायदेशीर असतानाही पोलिस व उत्पादन शुल्क विभाग का ? कारवाई करित नाही, असा प्रश्न विचारला जात आहे.
तालुक्यात शिंदीचे कोणत्याही प्रकारचे वन किंवा झाडे नसताना या ठिकाणी सदरील भट्टी चालविण्यास कोणत्या निकशावर परवानगी देण्यात आली ? संतापजनक नागरीकांना प्रश्न उपस्थीतीत केला.

महाराष्ट्र Business Katta










# ....बाईपण भारी देवा

आधुनिक केसरी

**भगवान शिव आणि पार्वतीची प्रेम कहाणी अद्भुत प्रेम कहाणी आहे. लैला मजनू, सोहनी महिवाल, हिर राँझा, कृष्ण राधा यांच्या प्रेम कहाणीचे किस्से-गोडवे सतत गायल्या जातात.परंतु भगवान शिवाला प्राप्त करण्यासाठी तब्बल 108 वेळा जन्म घेणाऱ्या शिव पार्वतीची प्रेम कहाणी ह्या सगळ्या प्रेम कहानी पेक्षा वेगळी आहे. पार्वती राज घराण्यातील आणि भगवान शिवशंकर हे भणंग व्यक्तिमत्व. ना अंगावर कपडे ना दागदागिने. वाघाचे कातडे कमरेला गुंडाळणारा भोळा शिवशंकर स्मशानात वास्तव्य करणारा, कपाळावर भस्म लावणारा, तरी देखील पार्वती शिवशंकराच्या प्रेमात आकंठ बुडालेली.**




सिद्धेश्वर राना पवार
संपर्क क्र.: 9422880080

लक्ष्मीच्या अंगावर दागदागिने, इतर देव्या दागिन्यांनी नटलेल्या, परंतु पार्वती ही साधी भोळी, ना गळ्यात दागिने ना हातात ना कमरेला. याच साध्या भोळ्या पार्वतीची ९ रूपे. त्याच ९ रूपांचे पूजन नवरात्रीच्या काळात केल्या जाते. पार्वतीच्या शैलपुत्री, ब्रह्मचारिणी, चन्द्रघण्टा, कूष्माण्डा, स्कंदमाता, कात्यायनी कालरात्रि, महागौरी अशा ९ रूपांचे पूजन ह्या काळात केल्या जाते. तर देवीचे अनेक रूपे आहेत त्या अर्थाने भवानी माता, रेणुका,जगदंबा यांना देखील भाविक पूजतात व या काळात भाविक भक्त जिथे देवी मंदिर असेल तिथे दर्शनाला जातात. साडे तीन शक्तीपीठ त्यामध्ये तुळजापूरची आई भवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूरगडावरील रेणुका माता आणि अर्धे शक्तीपीठ असलेली वणी ची सप्तशृंगी आदी ठिकाणी नवरात्रात कमालीची गर्दी असते. तर अनेकजण आपली जी कुलदेवता असते तिच्या दर्शनाला जातात. नवरात्राच्या निमित्ताने केल्या जाणारे हे पूजन गैर अजिबात नाही.परंतु नवरात्र उत्सवाच्या निमित्ताने सर्वत्र जिकडे तिकडे गरबा आयोजनाचे प्रमाण कमालीचे वाढले आहे.

नटून थटून बायका गरबा खेळायला जातात. त्यासाठी १५ दिवस अगोदरपासून तयारी केल्या जाते. कोरिओग्राफर लावून विविध गाण्यावरील गरबा नृत्य बसविल्या जात आहे.

चार भिंतीत आणि घरकामातच गुंतून राहत असलेल्या महिलांना या निमित्ताने चार क्षण आनंदाचे जगायला मिळत आहेत.

एका एका गावात प्रत्येक वार्डात गरबा चे आयोजन करण्यात आले आहे. आपला उत्सव आपली संस्कृती टिकविणे, त्या उत्सवाचा आनंद साजरा करणे हे योग्य असले तरीही महिला भगिनींनी या काळात महिलांच्या कर्तृत्वाची गाथा समोर ठेवली तर ती भावी पिढीसाठी दिशादर्शक ठरू शकते.

विविध क्षेत्रात नेत्रदीपक कार्य केलेल्या महिलांची चरित्रगाथा, त्यांच्यावरील पुस्तकांचे वाचन,त्या अनुषंघाने प्रश्न मंजुषा, स्पर्धा, त्यांच्या कार्यांचे पूजन अशा पद्धतीने नवरात्र महोत्सव साजरा होणे अपेक्षित आहे.

राष्ट्रमाता जिजाऊ, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, माता रमाई,यासह आपण ज्या भागात, जिल्ह्यात राहतो त्या भागातील कर्तृत्ववान महिला, आपल्या क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या महिला अधिकारी यांचा सत्कार, पतीच्या निधनानंतर कमरेला पदर गुंडाळून आपल्या मुलांना उच्चविद्याविभूषित करणारी महिला अशा महिलांच्या कार्याचा गौरव महिलांनी केल्यास खऱ्या अर्थाने चालत्या बोलत्या देवीचे पूजन केल्या सारखे होईल..

**कोमल है कमज़ोर नहीं तू**
**शक्ति का नाम ही नारी हैं**
**जग को जीवन देने वाली**
**मौत भी तुझसे हारी हैं**
**जग को जीवन देनेवाली**
**मौत भी तुझसे हारी है**



# उपासमारी रोखण्यासाठी ठोस नियोजन आवश्यक



रमेश लांजेवार, नागपूर
संपर्क क्र. 9921690779

आधुनिक केसरी

**विश्व खाद्य दिवस कृतीत बदलायला पाहिजे तेव्हाच जगातील "उपासमारी" संपुष्टात येईल. खाद्यांन्नाची समस्या पहाता संयुक्त राष्ट्रसंघाने 16 आक्टोंबर 1945 ला "खाद्य व कृषि संघटन" ( एफएओ ) ची स्थापणा केली."कॉफ्रेस ऑफ द फूड एंड एग्रीकल्चर ऑर्गनाइजेश"(एफएओ) ने 16 आक्टोंबर 1979 पासून "विश्व खाद्य दिवस"साजरा करण्याची घोषणा केली. तेव्हापासुन जगात "आंतरराष्ट्रीय विश्व खाद्य दिवस" साजरा केल्या जातो. या दिवसांचा उद्देश म्हणजे जगातील वाढती भुकमरीची(उपासमारी) समस्यांच्या प्रती लोकांना जागरूक करने. उपासमारी, कुपोषण व गरीबीच्या विरूद्ध संघर्षाला मजबुती प्रदान करने. उपासमारीच्या समस्येकरीता संपूर्ण जग संघर्ष करीत आहे व उपासमारी, कुपोषण यातुन बाहेर निघण्यासाठी सर्वांचा संघर्ष सुरू आहे.**

भारताची अर्थव्यवस्था विकासाच्या मार्गावर वेगाने वाटचाल करीत आहे.परंतु आजही कोट्यवधी भारतीयांची भूक भागत नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.तर भारताचे एक चीत्र असेही आहे की गोडाऊनमध्ये करोडोंटन अन्न-धान्य सडत आहे. तरीही भारतात करोडोंच्या संख्येने लोक उपाशी आहेत.याचा परिणाम म्हणजे जगात देशांची छबी मलीन होवुन बदनामी होवु शकते.विश्व खाद्य दिवस साजरा करण्याचा उद्देश म्हणजे जगातील उपासमारी (भुकमरी) संपुष्टात आणणे.परंतु जगाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की,या कार्यक्रमाच्या इतके वर्षांनंतरही सुध्दा आजही जगातील करोडो लोकांना आम्ही दोन वेळचे जेवन सुध्दा देवु शकत नाही हे जगाचे दुर्भाग्यच म्हणावे लागेल."अन्न हे पुर्ण ब्रम्ह" म्हटल्या जाते.कारण अन्नाशिवाय कोणीही जगु शकत नाही. मानव, जीवजंतू वन्यप्राणी जंगल संपदा यांना आपल्या पोटाची खळगी भरण्यासाठी अन्नाची आवश्यकता असते.त्यामुळे अन्नाच्या नासाडीबाबत जागरूकता आवश्यक आहे.अन्न-धान्य पिकवीण्याकरीता पाण्याची आवश्यकता असते. त्याचबरोर सजीव व निर्जीव या दोन्ही घटकांना पाण्याची अत्यंत आवश्यकता असते.त्यामुळे अन्नाची संपूर्ण प्रक्रिया पाण्यावर अवलंबून असते. अन्न-धान्याला जेवढे महत्त्व आहे त्यापेक्षा जास्त महत्व पाण्यालासुध्दा आहे. कारण पाणी रहाले तरच अन्नाचे उत्पादन होऊ शकते.16 आक्टोंबर संपूर्ण जग "विश्व खाद्य दिवस"म्हणुन साजरा करतात. कारण खाद्दांनाची जोपासना करणे अत्यंत गरजेचे आहे. आज जगातील प्रत्येक व्यक्ती रोजगार मीळवीण्यासाठी का धावपळ करतो?,मोल-मजुर, कामगार काम मिळावे म्हणून का धावपळ करतो? यामागे एकच उद्देश असतो "वितभर पोटाची खळगी भरणे" कारण काहीना काम मिळाले नाही तर उपाशीपोटी राहावे लागते हे सुद्धा अर्धसत्य आहे याला नाकारता येत नाही.करोणा काळात जगातील अनेक देशांमध्ये उपासमारीची समस्या ओढावली. होती. कारण या काळात करोडो लोकांचा रोजगार हिरावल्या गेला होता.त्यामुळे भारतासह अनेक देशांमध्ये उपासमारीची समस्या दिसून आली.या उपासमारीच्या संकटात अनेकांना आपले प्राणसुध्दा गमवावे लागले. अशाप्रकारचे उग्ररूप करोणा काळात दीसुन आले.जगात खाद्यांन्नाला कुठेही तडा जाऊ नये याकरिता शेतकरी वर्ग आपल्या अंगातुन घाम गाळतो व शेती पिकवितो.तेव्हाच देशासह जगातील लोकांच्या "पोटाची खळगी" भरते.म्हणुनच शेतकऱ्यांना "अन्नदाता" म्हणुन संबोधल्या जाते. शेतकऱ्यांनी जर अन्न पिकवीले नाही तर संपूर्ण जनतेवर उपाशी मरण्याची पाळी येऊ शकते. परंतु मानवजातीला जिवीत ठेवण्याचे दायीत्व व जबाबदारी शेतकऱ्यांनी घेतली आहे.त्यामुळे सर्वप्रथम 16 आक्टोंबर विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने संपूर्ण शेतकरी बांधवांना मी "शतशत प्रणाम" करतो. कारण उन, पाऊस,थंडी,ओला दुष्काळ,कोरडा दुष्काळ, सुनामी आणि अकाल यांच्याशी संघर्ष करून शेतकरी शेतीतुन उत्पन्न काढत असतो. भारताला शेतकऱ्यांचा राजा संबोधल्या जाते म्हणजेच "कृषिप्रधान देश"परंतु गेल्या 76 वर्षांपासून आजही भारतीय शेतकरी दुःखी असल्याचे दिसून येते. कारण आजही शेतकऱ्यांना त्यांच्या मालाला सरकार कडून योग्य भाव मिळत नाही.सरकारने कृषिविधेक पास केले परंतु या विधेयकाला शेतकऱ्यांचा आताही कडाडून विरोध आहे. सरकारकडुन बाजार समिती किंवा मंडीमध्ये योग्य भावाची घोषणा केली जात नाही.त्यामुळे भारतीय शेतकरी नाराज असल्याचे दिसून येते.आज शेतकऱ्यांचा विचार केला तर मनाने व स्थावर मालमत्तेच्या दृष्टीकोनातून करोडपती आहे.परंतु "आर्थिकदृष्ट्या कंगाल" आहे.कारण भारतात शेतकऱ्यांचे रक्त पिण्याचे काम दलाल,व्यापारी व राजकीय पुढारी वर्ग नेहमीच करताना दिसतात.आज व्यापाऱ्याजवळ, राजकीय पुढाऱ्यांजवळ चारचाकी गाडी, बंगला, सोने-नाने, चल-अचल संपत्ती व अवैध संपत्ती दिसून येते हे आले कोठून? भारतातील शेतकरी राबराब राबतो परंतु आताही त्यांच्या नशिबी "भोपळा" आल्याचे दिसून येते.कारण कोणतीही सरकार असो ती पुर्णपणे व्यापाऱ्यांच्या व पुंजीपती यांच्या पाठीशी असल्याचे गेल्या 76 वर्षांपासून आपण पहात आहोत. त्यामुळे आज शेतकरी वर्ग मागासलेला आहे. भारत स्वतंत्र झाल्यानंतर ही भारतीय शेतकऱ्यांनी जनतेला अन्न-धान्याची कमतरता पडू दिली नाही.परंतु चीनमध्ये 1970 मध्ये भुकमरीची महाभयानक लाट आली अशा परीस्थितीत चीनजवळ खायला अन्न-धान्य नव्हते म्हणुन त्यांनी अन्न-धान्याऐवजी कुत्रे, मांजर, पाल, साप,कीडे-माकोडे व अन्य प्राणी खायला सुरुवात केली.चीनची ही भयावह स्थिती पहाता चीन सरकारने प्रतीबंधीत प्रांण्यांना जनतेला नेहमी करीता खाण्याची परवानगी दिली.अशा कठीण परिस्थितीतुन जाऊनसुध्दा आज चीन बलाढ्य देश बनला आहे. याचे संपूर्ण चीत्र आपल्याला वुहान प्रांतातुन दिसून आले. परंतु भारतीय शेतकऱ्यांनी स्वतंत्र पूर्वकाळात व स्वतंत्र्यानंतरसुध्दा भारत वासीयांना अन्नची कमी पडु दीली नाही ही भारतीय शेतकऱ्यांची महानता आहे. परंतु सरकारच्या अन्न-धान्य साठ्याचे नियोजन गोडाऊन यांच्या कमतरतेमुळे दरवर्षी करोडो टन अन्नधान्य सडत असते आणि यातुनच उत्पन्न होते भुकमरी (उपासमारी)ची सुरुवात. आजही भारतात मेळघाट सारख्या अनेक भागात भुकमरी व कुपोषणाची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते असे का? याचा अभ्यास राजकीय पुढाऱ्यांनी करण्याची गरज आहे.आज भारतात उलटी



गंगा वाहतांना दीसते देशातील 60 टक्के शेतकऱ्यांकडे करोडो रुपयांची शेती आहे. परंतु आजही भारतीय शेतकरी गरीब आहे. याचे मुख्य कारण म्हणजे राजकीय पुढाऱ्यांनी व व्यापाऱ्यांनी आतापर्यंत शेतकऱ्यांचे फक्त रक्त पिण्याचे काम केल्याचे दिसून येते.त्यामुळेच आज भारतात अनेक भागातील अन्नदाता शेतकरी आत्महत्यां करतांना दिसतो.कारण त्यांची संपूर्ण शेती निसर्गावर अवलंबून असते. आतातर वातावरणातील बदलाने शेतकऱ्यांना अत्यंत कठीण परिस्थितीत आनुण ठेवले आहे. विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकरी सरकारला विचारते की मुठभर नगरसेवक, आजी-माजी आमदार- खासदार व मंत्री मेहनत न करता पाच वर्षांत करोडपती व अरबोपती कसेकाय होतात? राजकीय पुढारी शेतकऱ्यांपेक्षा एवढा मोठा आहे का? की त्याला गलेलठ्ठ पगार, पेन्शन, इतर भत्ते सरकार देते व शेतकऱ्यांना भोपळा देते. हे लोकशाहीच्या देशात चालत तरी काय? सर्व राजकीय पुढारी सांगतात की आम्ही शेतकऱ्यांच्या पाठीशी आहोत. समान अधिकार, समान न्याय असे खोकले आश्वासन देतात. परंतु आजच्या परिस्थितीत राजकीय पुढारीच शेतकऱ्यांचा घात करतांना दिसत आहे.त्यामुळे सरकारने शेतकऱ्यांच्या प्रती जागरूकता दाखवुन विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने शेतकऱ्यांना सर्वोतोपरी मदत केली पाहिजे. आंतरराष्ट्री माहिती नुसार जगात "उपाश्यापोटी" झोपणाऱ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत असल्याचे सांगण्यात येत आहे. संयुक्तराष्ट्र खाद्य आणि कृषिसंघटना नुसार 2002 च्या तुलनेत खाद्यान्नवस्तुच्या किंमतीत 140 टक्याने भारीभरकम वाढ झाली आहे.यामुळे डिसेंबर 2007 पासुन 40 देशांना खाद्यांन्न संकटाचा सामना करावा लागत होता. सध्या गेल्या 18 महिन्यांपासून सुरू असलेले रशिया-युक्रेन युद्ध भयावह स्थितीमध्ये आहे आणि आणि आता अचानक इजरायल विरूद्ध हमास आतंकवाद्यांचा संघर्ष टोकाला पोहोचला आहे यात हमासच्या बाजुंनी अनेक इस्लामीक देश उडी घेण्याच्या तयारीत आहे म्हणजेच युध्दाचा भडका महाभयानक स्थितीत आहे. याचा परिणाम अन्नसाठ्यावर होवून अत्यंत गंभीर परिस्थिती निर्माण होऊ शकते. "भारतीय खाद्य निगमने" स्वतः कबुल केले आहे की दरवर्षी गोदामातील 50 करोड रुपयांचा अनाज म्हणजे 10.40 लाख मीट्रिक टन पर्यंत अनाज सडतो किंवा खराब होतो.हीबाब कृषी प्रधान देशाच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर,दुःखद व चिंतेची आहे. कारण खराब होणारे अन्न-धान्य प्रत्येकवर्षी सव्वा करोड लोकांची भूक मिटवू शकते. परंतु भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल की शेतकऱ्यांनी मेहनतीने तयार केलेला लाखो टन अनाज सडतो आणि यामुळेच भुकमरीची समस्या उद्भवत आहे याला नाकारता येत नाही.यामुळेच भारतात करोडो लोक उपाश्यापोटी झोपतांना दीसतात. भारताची हेही समस्या आहे की सहा वर्षांखालील 47टक्के मुले कुपोषणाची शीकार होत आहे.एफएओच्या माहिती नुसार भारतात 2009 मध्ये 23 करोड 10 लाख लोक भुकमरीचा सामना करीत होते. त्यामुळे आजही भारतात भुकमरीची संख्या कमी न होता दीवसें-दीवस वाढतच आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे. ग्लोबल हंगरच्या इंडेक्सने जारी केलेल्या 2023 च्या आकडेवारीनुसार भारताचा विश्व भुकमरी सुचकांकमध्ये 125 देशांच्या तुलनेत 111 वा नंबर लागतो ही बाब भारताच्या दृष्टीकोनातून अत्यंत गंभीर व चिंताजनक आहे.या उलट भारताच्या शेजारील देशांचा विचार केला तर त्यांची परिस्थिती भारतापेक्षा चांगली आहे यात पाकिस्तान- 102, बांगलादेश-81, नेपाळ-69, श्रीलंका -60 व्या स्थानावर आहे. गेल्या काही महिन्यांपासून देशातील 20 कोटी लोकांना मोफत अन्न-धान्याची "प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजना"असतांना सुध्दा भुकबळीची संख्या वाढत आहे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. भारतात सर्वेमध्ये हेही लक्षात आले की लग्नसमारंभ, महाप्रसाद व अन्य जेवणाच्या कार्यक्रमात हजारो टन खाद्यान्न वाया जाते.याला कोठेतरी रोखलेच पाहिजे.आजच्या परीस्थितीत अन्नाचा प्रत्येक कन वाचवीण्याची गरज आहे. आज अन्नाचा प्रत्येक दाना महत्वाचा आहे. तेव्हाच म्हणतात "दाने दाने पे लिखाण है, खाने वाले का नाम" या म्हणीची पुर्ततः होवु शकते. आज 140 कोटी जनतेचे दायीत्व बनते की अन्नाचा प्रत्येक कण वाचवुन देशातील उपासमारी व कुपोषण यावर अंकुश लावला पाहिजे.विश्व खाद्य दिवसांच्या निमित्ताने मी 140 कोटी जनतेला विनंती करतो की "अन्नाचा एक-एक कन वाचवीण्याची नीतांत गरज आहे. कारण देशातील वाढती लोकसंख्या व जगातील युद्धजन्य परिस्थिती पहाता अन्न-धान्याचे जतन करने अत्यंत गरजेचे आहे. कारण भारतात बालकांच्या कुपोषणाची स्थिती अत्यंत वाईट आहे. त्याचप्रमाणे मी सरकारला आग्रह करतो की अन्न-धान्याचा काळाबाजार ताबडतोब रोखला पाहिजे व जमाखोरांच्या प्रती कठोर पाऊल उचलुन त्यांच्या मुसक्या आवरल्या पाहिजे. तेव्हाच विश्व खाद्य दिवसाला खरे महत्व येईल. संपूर्ण जग एकीकडे खाद्यांनासाठी आठा-पीटा करून वन-वन हिंडत आहे तर दुसरीकडे संपूर्ण जग युद्धाच्या उंबरठ्यावर येऊन बारूदच्या ढीगाऱ्यावर बसल्याचे दिसून येते.म्हणजेच आज जगात खाद्यान्ना पेक्षा दारूगोळ्याला जास्त महत्व दिल्या जात आहे. याला कोठेतरी रोखलेच पाहिजे अन्यथा अनर्थ होवू शकतो. याकरिता जीवन जगण्यासाठी खाद्यांनाकडे प्रत्येक देशांनी तत्परता दाखवुन उपासमारी, कुपोषण, भुकमरी याला पुर्णविराम लावण्यासाठी युद्ध पातळीवर प्रयत्न केले पाहिजे यातच जगाचे कल्याण आहे.

# बहुजनांनी महामानवांची शिकवण अनुसरावी



बुद्धभूषण चं. कांबळे
संपर्क क्र. 7498715661

आधुनिक केसरी

**आपली भारत भूमी महापूरुषांची भूमी म्हणून ओळखली जाते. आपल्या भारत भूमीत अनेक महामानव होऊन गेलेत.थोर संत,विचारवंत लेखक-कवी व कलावंत होऊन गेलेत.त्यांनी समस्त मानव जातीला सदाचाराची व समतेची शिकवण दिली.तमाम मानव जातीला समतेचा व मानवी कल्याणाचा मार्ग दाखवला.भारत भूमीच्या उन्नतीसाठी आपले संपूर्ण जीवन वेचले.आपल्या भारत देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी त्यांचा सिंहाचा वाटा आहे. त्यांच्यामूळेच तर आज आपण आनंदाने जीवन जगत आहोत.महान विचारवंत तथागत भगवान गौतम बुद्धांनी जगाला समतेचा व अहिंसेचा मार्ग दाखवला व लगेच धम्म प्रचार व प्रसार करून बुध्द धम्माची पेरणी केली व धम्म वाढवला.**

छत्रपती शिवाजी महाराजांनी समस्त रयतेसाठी लढा उभा केला व स्वराज्याची पेरणी करून स्वराज्य उभे केले. महात्मा फुलेंनी समस्त स्त्रीजातीसाठी स्त्री मूक्तीचा लढा उभा करुन स्त्री शिक्षणाचा पहिला पाया रचला.पूण्याच्या भिडे वाड्यात मूलींसाठी पहीली शाळा उभी केली.एवढेच नव्हे तर गोरगरीब जनतेसाठी म्हणजेच दलितांसाठी स्वतःच्या घरातील पाण्याचा हौद खूला केला. तसेच स्त्रियांचे केशवपन करण्याची अनिष्ट रूढी व पध्दत बंद केली. राजर्षी शाहू महाराजांनी समस्त गोरगरीब जनतेच्या मुलामूलींसाठी समतेचा व मानवतेचा लढा उभारुन वस्तिगृह व शाळा उभ्या केल्या.इतके महान कार्य या महामानवांनी केले आहे. तर मग या महामानवांची शिकवण आपण का अनूसरु नाही? तर अनूसरावीच लागेल कारण ते तर आपले परम कर्तव्य आहे.महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मूलमंत्र दिला आहे. तो आत्मसात करणे काळाची गरज आहे. तसेच शिक्षण हे वाघिणीचे दूध आहे जो कोणी प्राषण करेल तो वाघासारखा गुरगूरल्या शिवाय राहाणार नाही. हे बाबासाहेबांनी आपल्याला आवर्जून सांगितले आहे. म्हणूनच या तमाम महामानवांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून आपण त्यांनी दाखवलेल्या मार्गावर वाटचाल करुन आपण आपली प्रगती साधून घेतली पाहिजे. या महामानवांनी स्वतःसाठी काहीच केलं नाही. जे काही केलं आहे. ते इथल्या तमाम बहूजनांसाठी केलं आहे. त्यांनी कधी स्वार्थ पाहिला नाही किंवा कधी स्वतःसाठी काही कमावले नाही.त्यांचा केवळ एवढाच उद्देश होता की इथला बहूजन समाज खूप शिकला पाहिजे व मोठ्या पदावर दिमाखाने बसला पाहीजे. या महामानवांचे चारीत्र्य







बावनकशी सोने होते. त्यांनी कधी चारीत्र्याला डाग लागू दिला नाही. ते आयूष्यभर निर्व्यसनी राहीले व समाजाला निर्व्यसनी राहाण्याची शिकवण दिली. म्हणून मित्रांनो आपणही या महामानवांची शिकवण अंगिकारली पाहिजे व आपले जीवन सूखी सुंदर व समृद्ध केले पाहिजे....

# स्वत:मध्ये दडलेल्या रावणाचे दहन केव्हा करणार ?

आधुनिक केसरी

**सध्या नवरात्र उत्सव सुरु झाला आहे. आता दसरा सण जवळ येत आहे. 'दसरा सण मोठा नाही आनंदाला तोटा', असे म्हणत दसरा सणाच्या दिवशी आपण आपटा या वनस्पतीची पाने नातलगांना व मित्रांना सोने म्हणून वाटतो. हे सोने वाटून त्यांचे आशीर्वाद घेतले जातात.वैरभाव विसरुन जाऊन एकमेकांची गळाभेट घेऊन स्नेहभाव वृद्धिंगत केला जातो आणि दसरा सणाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे गावोगावी व प्रत्येक शहरात रावणाच्या पुतळ्यांचे दहन केले जाते. दरवर्षी दसरा सणाच्या दिवशी रावणाचे भले मोठे पुतळे उभारुन, फटाक्यांची आतिषबाजी करुन रावणाच्या पुतळ्यांचे दहन केले जाते.**

परंतु जे लोक रावणाच्या पुतळ्यांचे दहन करण्यासाठी पुढाकार घेतात आणि ज्यांच्या हस्ते रावणाचे दहन केले जाते ते सगळे लोक खरोखरच नेक, इमानदार, चारित्र्यवान, कर्तव्यदक्ष प्रामाणिक असतात का?चांगल्या विचारांचे आणि शुद्ध नीतीचे असतात का?

आपण बघत असतो की आजकाल बहुतांश लोक भ्रष्टाचारी, बेईमान, चारित्र्यहीन, कामचुकार आणि व्यसनांमध्ये गुरफटलेले असतात. मुली व महिलांकडे नेहमी वाईट नजरेने बघितले जाते. चालाकी व बेइमानीने अमाप संपत्ती जमवली जाते. गोरगरीबांचे शोषण करायचे, जातीयता कटाक्षाने पाळायची, धर्मांधता बाळगायची, कटकारस्थान करायचे. मोठ्या पगाराची नोकरी असली तरीही वरकमाई साठी लाच मागायची. वरकमाईतून चंगळवादी जीवन जगायचे. जीवनात ऐश करायची. हे सर्रास सुरू आहे. म्हणून सांगायचा मुद्दा असा आहे की काल्पनिक रावणाचे पुतळे जाळून क्षणाचा आनंद मिळतो. पण स्वतःमध्ये दडलेला दुर्गुणी रावण आपण केव्हा जाळणार आहोत?

रावणाचे हवे तितके पुतळे खुशाल जाळा परंतु आपल्या मध्ये असलेला अहंकार,संपत्तीचा मोह, हेवा, मत्सर आणि वासना यांचेही दहन करा. मदिरा, सिगारेट, गुटखा आणि तंबाखूजन्य पदार्थांच्या व्यसनामुळे आपले व आपल्या कुटुंबाचे अमाप नुकसान होत असते. हे लक्षात घेऊन रावणाच्या पुतळ्याबरोबर आपले व्यसन ही कायमचे जाळून टाका.रावणाच्या पुतळ्यांसंगे आपल्या अंगी भिनलेली भ्रष्टाचाराची व लाच घेण्याची कुप्रवृत्ती ही कायमची दहन करा. तुम्ही ज्या पदावर नोकरी करताय ती इमानेइतबारे करता का? तुम्ही तुमचे कर्तव्य पार पाडत समाजाचे व देशाचे हित साधता का?दर महिन्याला पगार घ्यायचा पण कर्तव्यापासून दूर पळत असाल तर अशा या प्रवृत्तीचे अगोदर दहन करा.आयाबहिणींकडे वासनांध नजरेने बघण्याच्या घाणेरड्या सवयीचे आत्ताच्या आत्ता दहन करा.संपत्तीच्या हव्यासाचे, नातलगांना कमी लेखण्याच्या वृत्तीचेही जरुर दहन करा.आपल्या स्टाफ मधील सहकाऱ्यांना कमी लेखण्याच्या प्रवृत्तीला कायमचे जाळून टाका.स्वतःमध्ये खदखदणारा राग व तापट स्वभाव यांचेही कायमचे दहन करा.

दरवर्षी दसरा सणाच्या दिवशी रावणाचा पुतळा उत्स्फूर्तपणे जाळायचा,आनंद व्यक्त करायचा आणि घरी परतताना मात्र स्वतः मधला रावण तसाच जीवंत ठेवायचा.याला काय अर्थ?त्यापेक्षा प्रत्येकाने काल्पनिक रावणाचे पुतळे जाळून टाकण्यापेक्षा स्वतः मधला दडलेला रावण जाळून टाकला तर सगळे कसे चांगले होईल.समाजात व देशात शांतता नांदेल.आपण सगळे माणूस बनून गुण्यागोविंदाने जीवन जगत राहू.

तर मग यावर्षी दसरा सणाच्या दिवशी स्वतः मधला रावण नक्की जाळून टाका. किती दिवस रावणाचे काल्पनिक पुतळे जाळत राहायचे?

बबन दामोदर गुळवे
९७३०९३९७३२

# दुष्काळामुळे अडचणी तरी गाळप हंगामाचे उद्दिष्ट्य पूर्ण करू

## आ. आशुतोष काळे : कर्मवीर काळे कारखान्याचा ६९ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ

आधुनिक केसरी न्यूज

**कोपरगाव :** सहकारी साखर कारखानदारीला संकटे नवीन नाहीत मागील वर्षी अतिवृष्टीमुळे ऊस उत्पादन घटले होते तर यावर्षी दुष्काळी परिस्थितीमुळे ऊस टंचाई जाणवणार आहे त्यामुळे साहजिकच साखर कारखानदारीपुढे गाळप हंगामाचे उद्दिष्ट्य पूर्ण करण्याचे मोठे आव्हान असले तरी हे आव्हान पूर्ण करून सर्वांच्या सहकार्याने गाळप हंगाम यशस्वी करू असा विश्वास कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन आ. आशुतोष काळे यांनी काळे यांनी व्यक्त केला आहे. कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्याचा २०२३/२४ या वर्षाच्या ६९ व्या गळीत हंगामाचा बॉयलर अग्निप्रदीपन समारंभ कारखान्याचे मार्गदर्शक व जेष्ठ संचालक माजी आमदार अशोकराव काळे यांच्या अध्यक्षतेखाली व चेअरमन आ. आशुतोष काळे यांच्या प्रमुख उपस्थितीत व्हा.चेअरमन डॉ. मच्छिंद्र बर्डे व त्यांच्या सुविद्य पत्नी सौ.चित्राताई बर्डे यांच्या शुभहस्ते विधिवत पूजा करून करण्यात आला याप्रसंगी आ. आशुतोष काळे बोलत होते.

पुढे बोलतांना आ. आशुतोष काळे म्हणाले की, मागील चार वर्ष मोठ्या प्रमाणात पर्जन्यमान झाल्यामुळे ऊस टंचाई जाणवली नाही व पाण्याची देखील टंचाई भासली नाही. मात्र यावर्षी सलग ४० ते ४५ दिवस पावसाचा खंड पडल्यामुळे सर्वच पिकांबरोबर ऊस पिकांचे देखील मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. ऊसाचा वापर चाऱ्यासाठी होत असल्यामुळे गाळपाला किती ऊस उपलब्ध होईल याबाबत अंदाज बांधणे कठीण असून यापूर्वी दुष्काळी परिस्थितीमुळे सन २०१६-१७ चा गाळप हंगाम ७३ दिवस व सन २०१९-२० चा ९६ दिवसाचा गाळप हंगाम झाला होता त्याचीच पुनरावृत्ती चालू वर्षी व पुढील वर्षी होवू शकते. त्यामुळे कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त उत्पादन करून या परिस्थितीवर मात करावी लागणार आहे. त्यासाठी चालू हंगामात तुटणा-या ऊसाचे जास्तीत जास्त खोडवे ठेवून पाचट अच्छादन करावे. दुष्काळी परिस्थिती पाहता पुन्हा एकदा ऊस शेतीसाठी नव्हे तर सर्वच पिकांसाठी ठिबक जलसिंचनाचा व तुषार सिंचनाचा वापर करावा लागणार आहे त्यामुळे निश्चितपणे पुढीलवर्षी काही प्रमाणात ऊस उपलब्ध होण्यास मदत होणार असल्याचे त्यांनी सांगितले. मागील वर्षीचा गळीत हंगाम पहिल्या टप्प्यात पूर्ण झालेल्या ११० टन क्षमतेचा बॉयलर, ०८ मेगा वॅटचे टर्बाईन व चार मिलचे माध्यमातून यशस्वी केला आहे. दुसऱ्या टप्प्यातील आधुनिकीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. ६००० मे.टन प्रतिदिन गाळप क्षमता असलेले बॉयलिंग हाऊसची उभारणी करण्यात येवून इरेक्शनचे काम जवळपास पूर्ण झालेले आहे. मशिनरीच्या चाचणी सुरु असून यावर्षीचा गळीत हंगाम पूर्णपणे नव्या आधुनिक कारखान्यावर घेण्यात येणार आहे. कारखान्याने नेहमीच ऊसाला जास्तीत जास्त दर देवून मुदतीच्या आत ऊस उत्पादक शेतकऱ्यांना पेमेंट दिल्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचा कल आपल्या कारखान्यास ऊस देण्याकडे आहे त्यामुळे गाळपाचे ठरविलेले उद्दिष्ट्य पूर्ण होण्यास मदत होणार असल्याचे आ. आशुतोष काळे यांनी सांगितले.

यावेळी ज्येष्ठ कार्यकर्ते कारभारी आगवण, बाळासाहेब कदम, पद्माकांत कुदळे, एम.टी. रोहमारे, ज्ञानदेव मांजरे, विश्वासराव आहेर, नारायणराव मांजरे, संभाजीराव काळे, सुनील शिंदे, भास्करराव चांदगुडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष माधवराव खिलारी, सिकंदर पटेल, राजेंद्र ढोमसे, अखिल भारतीय सरपंच महासंघाचे अध्यक्ष बाळासाहेब जपे, कर्मवीर शंकरराव काळे कारखान्याचे संचालक सुधाकर रोहोम, सूर्यभान कोळपे, राजेंद्र घुमरे, दिलीपराव बोरनारे, शंकरराव चव्हाण, राहुल रोहमारे, श्रावण आसने, शिवाजी घुले, वसंतराव आभाळे, श्रीराम राजेभोसले, दिनार कुदळे, अशोक मवाळ, सुनील मांजरे, मनोज जगझाप, गंगाधर औताडे, सौ. इंदूबाई शिंदे, सौ. वत्सलाबाई जाधव, कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक रामदासजी केकाण, गौतम कुक्कुटपालनचे चेअरमन विजयराव कुलकर्णी, गौतम बँकेचे व्हा. चेअरमन बापूराव जावळे, गोदावरी खोरेचे संचालक दिलीपराव शिंदे,कारखान्याचे प्रभारी कार्यकारी संचालक सुनील कोल्हे, आसवणी विभागाचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, सेक्रेटरी बाबा सय्यद, असि. सेक्रेटरी एस. डी. शिरसाठ, तसेच सर्व सलग्न संस्थानचे चेअरमन, व्हा.चेअरमन, संचालक व सर्व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन अरुण चंद्रे यांनी केले तर संचालक दिनार कुदळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.



**पाण्यावर अर्थकारण अवलंबून, त्यासाठी आंदोलन उभारणार** : नगर नासिकच्या धरणातील पाणी साठ्याचा आढावा घेवून मेंढेगिरी समितीने निश्चित केलेल्या सूत्रानुसार औरंगाबाद येथे होणाऱ्या बैठकीत जायकवाडीत पाणी सोडण्याबाबत निर्णय घेतला जाणार आहे . मेंढेगिरी समितीची पाणी वाटप निर्णय चुकीचा आहे . त्यामुळे नवीन समिती तयार करण्यात आली असून या समितीचा अहवाल आल्याशिवाय निर्णय घेवू नये हि भूमिका वार्षिक सर्वसाधारण सभेत मांडली होती . त्याबाबत न्यायालयात याचिका देखील दाखल केलेली आहे . ज्याप्रमाणे पैशाचे सोंग करता येत नाही त्याप्रमाणे पाण्याचे देखील सोंग करता येत नाही . पाण्यावर ग्रामीण आणि शहरी भागाचे अर्थकारण अवलंबून आहे . औरंगाबादच्या बैठकीत काहीही निर्णय झाला तरी जायकवाडीत पाणी सोडण्याला विरोध राहणार आहे . जायकवाडी धरण जवळपास ६० टक्केच्या आसपास भरलेले असतांना दुष्काळी परिस्थितीत ५ टक्यासाठी पाण्याची नासाडी कशाला ? त्यामुळे जायकवाडीला पाणी जावू नये यासाठी एकजुटीने मोठे आंदोलन उभारावे लागेल . – **आ . आशुतोष काळे**

# फुले, आंबेडकर, कलाम यांच्या विचारांचा आदर्श घ्या: तहसीलदार बोरगावकर

आधुनिक केसरी न्यूज

**सचिन मोरे**

**कंधार :** महात्मा फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम हे संपूर्ण जगाला वंदनीय असून त्यांनी शुन्यातून इतिहास घडवला, त्यांचे कार्य हे अजरामर असून येणाऱ्या पिढीला सतत प्रेरणादायी आहे, त्यामुळे युवक तरुण मित्रांनी प्रतिकुल परिस्थीतीला दोष न देता आहोरात्र कठोर परिक्षम घेत यशस्वी व्हावे, असे अवाहन कंधार चे तहसिलदार तथा न.पा.चे मुख्याधिकारी राम बोरगावकर यांनी केले.

नगर परिषद संचलीत डॉ. बाबासाहेब वाचनालय कंधार येथे १५ ऑक्टोबर २३ रोजी भारताचे माजी राष्ट्रपती अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्य वाचनालयातर्फे वाचन प्रेरणा दिवसांचे दोन दिवसीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये १५ ऑक्टोबर रोजी सकाळी ठिक १०:०० वाजता ए.पी.जे अब्दुल कलाम यांच्या निवडक ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. तर १६ ऑक्टोबर रोजी वाचनालयाच्या अभ्यासकेतील स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्यांना विद्यार्थ्यांना मार्गदर्शन कार्यक्रमांचे प्रमुख मार्गदर्शक म्हणून तहसीलदार राम बोरगावकर व एस.बी.आय.चे शाखाधिकारी विलास रिनायत यांची प्रमुख उपस्थिती होती.

या प्रसंगी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बोरगावकर म्हणाले की कंधार हे एक ऐतिहासिक शहर असून या शहराला मोठा इतिहास आहे. येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर वाचनालय हे समृद्ध वाचनालय असून येथे विपुल ग्रंथसंपदा आहे, येणारा काळ हा स्पर्धेचा असून या काळामध्ये यशस्वी व्हायचे असेल तर झोकून देऊन कष्ट करा चांगल्या गोष्टीचा अंगीकार करा मोबाईलचा गैरवापर टाळा व वाईट व्यसनांपासून दूर रहा जीवन जगण्यासाठी खूप मार्ग आहेत. मेहनत घ्या, संघर्ष करा,आयुष्य हे सुंदर आहे. त्याचा उपभोग घ्या, असे आव्हान बोरगावकर यांनी यावेळी केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी डॉ.आंबेडकर डॉ.ए.पी.जे अब्दुल कलाम व सरस्वती मातेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येऊन कार्यक्रमाची सुरुवात झाली. यावेळी या वाचनालयास लवकरच बँकेमार्फत दान स्वरूपात आरो प्लॉट देण्यात येणार असल्याचे बोरगावकर यांनी जाहीर केले. यावेळी सहाय्यक ग्रंथपाल मोहम्मद रफीक सत्तार यांनी उपस्थितांचे स्वागत केले. या कार्यक्रमास तलाठी बालाजी केंद्रे वीरेंद्र गरुडकर, सचिन मोरे, न.पा.चे कार्यालयीन निरीक्षक जितेंद्र ठेवरे, दत्ता आयनवाड, मिलिंद महाराज, श्रीमती कमलबाई जाधव, प्रकाश गुंडेकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.



ग्रंथ प्रदर्शनास अनेकांच्या भेटी ...मान्यवरांकडून कौतुक : दि .१५ ऑक्टोबर आयोजित वाचन प्रेरणा दिनानिमित्त ग्रंथ प्रदर्शनास अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या, मान्यवरांनी न .पा .चे ग्रंथपाल मोहम्मद रफीक व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे तोंड भरून कौतुक करत वाचनालयाच्या भावी वाटचालीस शुभेच्छा दिल्या, यावेळी माजी नगराध्यक्ष रामराव पवार, व्ही के कांबळे, सेवानिवृत्त मुख्याध्यापक वाय जी महाबळे, सेवानिवृत्त शिक्षक ई जे बनसोडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी भेटी दिल्या .




# साहेब, ताई ,दादा, आबा हे डोक्यातून काढून टाका : आमदार पडळकर

## लोणंद येथे धनगर समाजाला आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** लढा आरक्षणाचा, लढा हक्काचा" हा नारा घेऊन धनगर जागर यात्रेच्या निमित्ताने लोणंद, ता. खंडाळा येथे विधानपरिषदेचे सदस्य व धनगर नेते आ. गोपीचंद पडळकर यांची सभा आयोजित करण्यात आली होती. खंडाळा तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने हे आयोजन करण्यात आले होते. काही दिवसांपूर्वीच खंडाळा तालुक्यातील सकल धनगर समाजाच्या वतीने नॅशनल हायवेवर खंडाळा घाट तब्बल दोन तास अडवुन रोष व्यक्त करण्यात आलेला होता. धनगर आरक्षणाचा हा लढा गतीमान झाला पाहिजे, म्हणून धनगर जागर यात्रेतुन प्रयत्न केले जात आहेत.लोणंद मध्ये या पूर्वी सुद्धा गोपीचंद पडळकर यांची सभा झाली होती. आज पुन्हा एकदा धनगर जागर यात्रेच्या अनुषंगाने आ.गोपीचंद पडळकर यांची सभा सोमवार दिनांक १६ ऑक्टोबर रोजी सायंकाळच्या दरम्यान लोणंदमध्ये पार पडली. यावेळी त्यांनी आक्रमक शैलीतुन टीकात्मक स्वरूपाचे भाषण केले. साहेब, ताई, दादा, आबा हे डोक्यातून काढुन टाका असा सल्ला समस्त धनगर समाज बांधवांना आ. गोपीचंद पडळकर यांनी दिला. तुम्हाला गुलाम बनविण्यासाठी ही सगळी यंत्रणा आहे. ही डोक्यातून काढून टाका, त्याला पहिली मुठमाती द्या, तरच तुम्ही राजे व्हाल, नाहीतर मग काय खरं नाही, असे सुध्दा आ.गोपीचंद पडळकर यांनी म्हटले.

यावेळी त्यांनी धनगर समाज बांधवांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचाराची आठवण करून दिली. यावर बोलताना पडळकर म्हणाले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितले होते की गुलामाला गुलामगिरीची जाणीव करून दिली तर तो पेटून उठतो, बंड करतो, तुम्हाला मी कितीवेळा सांगतोय की ही गुलामगिरी सोडून द्या, ह्याची त्याची सतरंजी उचलायची धंदे बंद करा. मला आजही धनगर आरक्षण जागर यात्रा काढावी लागत आहे.

आम्ही सहज सांगतो खंडाळा, वाई, महाबळेश्वरात आमची ६० हजार संख्या आहे. मग करायचं काय? त्याचं लोणचं घालायचं? करणार काय त्याचं तुम्ही ? असा सवाल आ. गोपीचंद पडळकर यांनी उपस्थित केला. फलटण मध्ये आम्ही एवढे आहे, माण खटाव मध्ये तेवढे आहे, बारामती मध्ये लाखाच्या वर आहे. इंदापुरात आमची ७०-८० हजार संख्या आहे. दौंड मध्ये ६५ हजार आहे. किती वर्ष हे चालणार? हे प्रश्नचिन्ह सर्वांसमोर उपस्थित केले. या कार्यक्रमावेळी सातारा जिल्हा परिषदेचे माजी समाजकल्याण सभापती आनंदराव शेळके, खंडाळा पंचायत समितीचे माजी सभापती रमेश धायगुडे, जिजाबा काळे, राजेंद्र बरकडे, युवा नेते ऋषिकेश धायगुडे, ॲड.वैभव धायगुडे, ईश्वर ठोंबरे, हितेश धायगुडे, अनिल धायगुडे, बाळासाहेब शेळके, हर्षवर्धन शेळके, किसन धायगुडे, पवन धायगुडे, महेश शेळके, संदिप धायगुडे, विकास धायगुडे, ज्ञानेश्वर धायगुडे तसेच खंडाळा तालुक्यातील धनगर समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**धनगरांची ताकत सरकारला दाखवून देऊ :** महाराष्ट्रातील धनगरांना धनगरी ताकत काय आहे हे सांगण्यासाठी आलो आहे . धनगर आरक्षणाची लढाई दोन्ही सुरू आहे .न्यायालयातील लढाई सोबतच ही रस्त्यावरील लढाई सुद्धा जागृत ठेवायला हवी . धनगराच्या पोराला झोप लागता कामा नये .तुम्ही आम्ही जागं राहिलं पाहिजे . रस्त्यावरची लढाई धनगराचा पोरगा हातामध्ये घ्यायला तयार आहे .हा लढा खूप महत्वाचा आहे . यासाठी खंडाळा वाई महाबळेश्वर मतदारसंघातील धनगराच्या पोरानं झोकून दिलं पाहिजे .यावर्षीचा दसरा मेळावा हा धनगरांच्या आरक्षणाच्या दृष्टीने खूप महत्वाचा आहे .आपल्या आरक्षणाच्या अंमलबजावणी साठी दसरा मेळाव्यातून धनगराची ताकत सरकारला दाखवून देऊ असे सुद्धा आ .गोपीचंद पडळकर या सभेतून म्हणाले .

# पिलीव गावची आदर्श सून सौ. अनिता अविनाश जेऊरकर..!

## सासूची अखंडितपणे सेवा करणारी सून..!

आधुनिक केसरी न्यूज

**सुजित सातपुते**

**पिलीव :** कोणतीही मुलगी लग्न झाल्यानंतर नवीन नवीन घरात आली तर तिला त्या घरातील व्यक्तीचा स्वभाव माहीत नसतो. सासु म्हणजे अगोदर आपल्याला सांगितलेल असत कि तिकडे काही बोलायच नाही.ऐकून घ्यायच मग छोट्या-छोट्या कारणावरून भांडण होतं आणि मनात राग येतो.त्यापेक्षा सासू ही आपल्यापेक्षा मोठी असते.आपण तिच्या मनासारखं वागले तर तिला पण बरं वाटतं आपण तिला आपल्या आईसारखा मानपान दिला तर आपल्याला माहेर कशाला आठवेल,आपल्याला तिकडे जाण्याची गरज कशाला लागेल,नाहीतरी आपल्याला जीवनभर सासू-सासरा,नवरा व मुले यांच्यासोबतच राहायचं असत नेहमी माहेरी जाऊन अडचणी वाढवून घेण्यापेक्षा सासरी राहून जुळवून घेतलेल कधीही चांगल. असाच जर महाराष्ट्रातील प्रत्येक स्त्रीने विचार केला तर महाराष्ट्रातीलच नव्हे तर संपूर्ण भारत देशातील वृद्धाश्रमे बंद पडतील. वाचताना आश्चर्य वाटतंय ना? तर हो आहे अशीच एक स्त्री माळशिरस तालुक्यातील पिलीव गावची सून विद्यमान ग्रा.पं.सदस्या सौ.अनिता अविनाश जेऊरकर या पिलीवसह परिसरातील सर्वांच्या परिचित आहेत. श्रीमती उज्वला देविदास जेऊरकर या साठ वर्षाच्या असून तब्बल आठ वर्षापासून ब्रेन ट्युमर सारख्या भयंकर अशा मोठ्या आजाराशी झुंज देत आहेत.त्यांची ती झुंज चालू आहे ती फक्त लेकीसारख्या सौ.अनिता जेऊरकर या सुनेमुळे, सन २०१४-१५ साली पिलीव परिसरातील नामांकित अशा जेऊरकर परिवारावर काळाने घावा घातला व जेऊरकर घराण्याच्या प्रमुख श्रीमती उज्वला देविदास जेऊरकर यांना ब्रेन ट्युमर आजार असल्याचे निष्पन्न झाले.अशा भल्या मोठ्या आजाराने आपल्या आईला ग्रासले असल्याचे ऐकून जेऊरकर परिवारातील सदस्यांच्या पायाखालची वाळू सरकली परंतु अकलूज येथील सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ.एम.के इनामदार हे देवाच्या रूपाने धावून आले व शर्तीचे प्रयत्न करून उज्वला जेऊरकर यांना जीवदान दिले.जीव वाचला खरं परंतु





उज्वला जेऊरकर यांचे अंथरूण काही सुटले नाही.आज अखेर पर्यंत म्हणजेच गेल्या आठ वर्षापासून त्या अंथरुणावर झोपून ब्रेन ट्यूमर सारख्या आजाराला झुंज देत आहेत. या आठ वर्षात आपल्या माहेरी आपल्या आई-वडिलांना व भावाला भेटण्यासाठी न जाता आपल्या सासू मध्येच आपले आई-वडील व भाऊ असल्याचे मानून सौ. अनिता जेऊरकर या अविरतपणे, अखंडितपणे आपल्या सासूची सेवा करत असल्याचे पहावयास मिळत आहे.तब्बल गेल्या आठ वर्षापासून आपल्या घरामध्ये अंथरुणात पेशंट झोपून आहे.त्या पेशंटचा आपल्या मुलाला बाळांना संसर्गजन्य रोग होईल, पेशंटची दुर्गंधी येईल,पेशंटला जेवणासाठी वेगळी भांडी,वेगळी खोली, चिळसपणा चिडचिड करणे अशा सर्व काही हीन गोष्टींना बगल देत सौ.आनिता जेऊरकर या आपल्या सासूची तब्बल आठ वर्षापासून सेवा करत आहेत. रोज सकाळी सूर्योदयाच्या वेळेस घरातून बाहेर,कोवळ्या उन्हात बसवणे,सासूचा ब्रश करणे,शौच्यास घेऊन जाणे,आंघोळ घालणे,केस विंचरणे,वेळेवर नाष्टा,जेवण,गोळ्या औषध देणे,आपण बसतो उठतो त्याच खोलीत त्यांना झोपवणे,आठ वर्षापासून घरात पेशंट असून कधीही घरात पेशंट असल्याचे ये ना जाणाऱ्यांना भासू न देणे, औषध गोळ्यांची दुर्गंधी न येऊ देणे, घरात स्वच्छ व प्रसन्न वातावरण ठेवणे यासह अनेक छोट्या-मोठ्या कामासाठी उज्वला जेऊरकर यांच्या सेवेसाठी सौ.अनिता जेऊरकर या २४ तास अवेलेबल असतात. आपल्या वृद्धापकाळाची तजवीज आपणच केली पाहिजे.आपण आर्थिक, व्यावहारिक किंवा शारीरिक बाबींसाठी कोणावरही अवलंबून राहता कामा नये हा निर्धार व त्या दृष्टीने नियोजन करणारे अनेक ज्येष्ठ नागरिक आजकाल दिसतात.



# बाळापूर फागणेत वानराची दहशत

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे :** कधी घराच्या छतावर, कधी खिडकीत, तर कधी वेगवेगळ्या गाड्यांवर बसून नागरिकांच्या अंगावर धावून जाणाऱ्या वानराने धुळ्यातील बाळापूर उपनगर व फागणे गावात दहशत पसरवली आहे. गेल्या काही दिवसांपासून मुक्कामास असलेल्या या वानरानी गावात चांगलाच हैद्रोस केला आहे. तरी एकाला चावा घेतल्याचं ही सूत्रांकडून माहिती मिळाली आहे.यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. उन्हाच्या दाहकतेचा प्रभाव व जंगलव्याप्त भागात अन्न पिण्याच्या पाण्याची सोय नसल्याने वानरांचा पाण्याचा शोधात भरवस्तीत हैदोस वाढला आहे.वानरांच्या कळपाने भरवस्तीत मोर्चा वळवला असून या वानरांना पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी ही दिसून येत आहे. काही नागरिकांकडून या वानराची सेवा केली जात असून त्यांना अन्न पाणी दिल जात आहे.

मात्र भविष्यात या वानरांकडून मोठी दुर्घटना होऊ नये. म्हणून त्वरित वन विभागाने याची दखल घ्यावी. अशी मागणीही ग्रामपंचायत प्रशासनासह स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# प्राथमिक विभागाला माध्यमिकपेक्षा आठ दिवस अधिक दिवाळी सुट्या

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** विद्यार्थ्यांसह शिक्षकांचे लक्ष लागून असलेल्या दिवाळी सुट्ट्यांमध्ये जिल्ह्यातील प्राथमिक आणि माध्यमिक विभागात मोठी तफावत आहे. माध्यमिकसाठी १३ दिवस तर, जिल्हा परिषदेकडून प्राथमिक विभागासाठी २१ दिवसांच्या सुट्ट्यांचा उल्लेख पत्रकात करण्यात आला आहे. एकाच जिल्ह्यात प्राथमिक आणि माध्यमिक विभागात दिवाळी सुट्ट्यांमध्ये इतकी तफावत कशी, असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे.

दरवर्षी शासनामार्फत शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच त्या वर्षातील सुट्ट्यांचे वेळापत्रक जाहीर केले जाते. २०२३-२४ या शैक्षणिक वर्षातील सुट्ट्यांविषयी माध्यमिक विभागाचे प्रसिद्धी पत्रक जाहीर झाले असून त्यात सहा ते २१ नोव्हेंबर या कालावधीत दिवाळी सुट्ट्यांचा उल्लेख असून या सुट्ट्या एकूण १३ दिवस आहेत.दुसरीकडे जिल्हा परिषदेच्या प्राथमिक विभागाने २०२३-२४ वर्षासाठी जाहीर केलेल्या पत्रकानुसार सहा ते २९ नोव्हेंबर या कालावधीसाठी दिवाळी सुट्ट्यांचा उल्लेख असून या सुट्ट्या २१ दिवस आहेत. शासनाकडून प्राथमिक आणि माध्यमिक विभागात दिवाळी सुट्ट्यांबाबत भेदभाव करण्यात आल्याची चर्चा रंगली आहे. शासनाने सुट्ट्यांसंदर्भात प्राथमिक आणि माध्यमिक असा भेदभाव करु नये, अशी मागणी शिक्षक संघटनांकडून करण्यात येत आहे.



# उरण महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन

आधुनिक केसरी न्यूज

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य कला महाविद्यालयातील आजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभाग व गोपाळकृष्ण सार्वजनिक वाचनालय उरण यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंती निमित्त वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. तरुण विद्यार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती विकसित करण्याच्या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन केले गेले. महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. बळीराम एन.गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली गोपाळकृष्ण वाचनालयाच्या सभागृहात संपन्न झालेल्या या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.ए. आर. चव्हाण (आय क्यु ए सी समन्वयक) हे होते. त्यांनी आपले विचार प्रगल्भ करण्यासाठी वाचनाची आवश्यकता असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे ज्येष्ठ गजलकार राजेंद्र नाईक यांनी विविध गझल सादर करून विद्यार्थ्यांना प्रेरित केले. ग्रंथालय समितीचे अध्यक्ष एडवोकेट पराग म्हात्रे यांनी ग्रंथालयाची संपूर्ण माहिती व ग्रंथालय स्थापनेचा इतिहास सांगितला. संतोष पवार यांनी एपीजे अब्दुल कलाम यांचे जीवन चरित्र व वाचनाचे महत्त्व विद्यार्थ्यांसमोर मांडले. तर ग्रंथपाल श्याम धारासुरकर यांनी आरोग्य व ग्रंथ यांचा सहसंबंध स्पष्ट केला. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या आवडीच्या ग्रंथाचे प्रकट वाचन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. ए.के गायकवाड यांनी केले तर कार्यक्रमाचे आयोजक व्ही. एस इंदुलकर यांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रचिती माळी (टी वाय बी कॉम) हिने केले. कार्यक्रमास ग्रंथालयाचे प्रथम सदस्य दत्तात्रय जुवेकर, माजी अध्यक्षा श्रीमती वैशाली कोळगावकर, ग्रंथपाल श्रीमती जिजा घरत, राजेश शहा, संचालक परेश मेश्री, चेतन वडके,अनुपमा कांबळे, डॉ.दत्ता हिंगमिरे ग्रंथालयातील सर्व कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# वीज कंत्राटी कामगार मंत्रालयावर धडकणार

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील महावितरण महापारेषण व महानिर्मिती कंपनीत वर्षानुवर्षे नियमित विविध मंजूर रिक्त पदांच्या जागेवर कार्यरत असलेल्या राज्यातील सुमारे ४२, ००० वीज कंत्राटी कामगारांच्या हितार्थ आमची महाराष्ट्र वीज कंत्राटी कामगार संघ संलग्न भारतीय मजदूर संघ ही संघटना प्रयत्नशील आहे. या कामगारांचे वर्षानुवर्षे कंत्राटदार आर्थिक शोषण करत असून वीज कंपनी प्रशासना कडून सहकार्य मिळत नाही. या कामगारांच्या समस्यांचे निराकरण करून कंत्राटी कामगार पद्धत कायम स्वरूपी बंद करून पूर्वाश्रमीच्या महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ असतानाच्या ज्या शासन मान्यता प्राप्त रोजंदारी कामगार पद्धती (NMR) द्वारे त्या काळात कंत्राटदार विरहित रोजगार दिला जात होता त्याच पद्धतीने आज रोजी महावितरण महापारेषण व महानिर्मिती कंपनीत वर्षानुवर्षे नियमित विविध मंजूर रिक्त पदांच्या जागेवर कार्यरत असलेल्या सर्व वीज कंत्राटी कामगारांना रोजगार देण्यात येऊन त्यांना वीज कंपनीत सामावून घ्यावे ही आमच्या संघटनेची अनेक वर्षांपासूनची मागणी शासन दरबारी प्रलंबित आहे.

शासनाकडे प्रलंबित असलेल्या मागण्याकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी बुधवार दि.१ नोव्हेंबर २०२३ रोजी राज्यातील सर्व वीज कंत्राटी कामगार मंत्रालयावर आंदोलन करणार आहेत. या प्रलंबित मागन्यासाठी शासनाने संघटने सोबत आंदोलनापूर्वी सकारात्मक चर्चा करावी व या कामगारांच्या समस्यां दूर कराव्यात. तरी आपण सदर विषय आपण राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री मा.ना. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांना अवगत करून आपल्या मतदार संघातील वीज कंत्राटी कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करावा ही आपणास नम्र विनंती. अपर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे यांना निवेदन मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

या निवेदनावर सामाजिक कार्यकर्ते तथा काँग्रेस शहर सरचिटणीस सुभाष पाटील पांडभरे, ज्ञानेश्वर वाघ, रमेश भेंडे, जितेंद्र बिराजदार, अन्सार भाई खान, बाळासाहेब गाडेकर, आजिनाथ पडूळ आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.



# गुंजोटी, गुंजोटीवाडी, औराद येथील शेकडो युवकांचा शिवसेना ठाकरे गटात प्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

**धाराशिव :** जिल्ह्यातील उमरगा शहरातील होऊ द्या चर्चा या उपक्रमा अंतर्गत छत्रपती शिवाजी महाराज चौकात गुरुवार दि.(१२) सायंकाळी ७:०० समारोपीय सभा पार पडली. यावेळी गुंजोटी, औराद, गुंजोटीवाडी येथील शेकडो युवकांनी गुंजोटीचे माजी सरपंच विलास व्हटकर यांच्या नेतृत्वाखाली खासदार ओमराजे निंबाळकर, जिल्हाप्रमुख तथा कळंब-धाराशिवचे आमदार कैलास पाटील यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना ठाकरे गटात प्रवेश केला. यावेळी झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवसेना नेते केशव उर्फ बाबा पाटील होते. कार्यक्रमासाठी सहसंपर्कप्रमुख मकरंद राजे निंबाळकर, उपजिल्हाप्रमुख बसवराज वरनाळे, उमरगा-लोहारा विधानसभा पक्ष निरीक्षक अनंत पाताडे, उमरगा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती रणधीर पवार, जेष्ठ शिवसैनिक महावीर कोराळे, अशोक सांगावे, उमरगा शहराचे माजी नगराध्यक्ष रज्जाक (भाई) अत्तार, तालुकाप्रमुख बाबुराव शहापुरे, उपतालुकाप्रमुख सुधाकर पाटील, युवासेना तालुकाप्रमुख अजित चौधरी, उमरगा शहरप्रमुख राजेंद्र सूर्यवंशी, मुरूम शहरप्रमुख जगदीश निंबरगे, माजी तालुकाप्रमुख विजयकुमार नागणे, प्रा. डी. के. माने, शिवदूत जितेंद्र पोतदार, माजी उपतालुकाप्रमुख भगवान जाधव, गुंजोटीचे माजी सरपंच विलास व्हटकर, माजी पस सदस्य मारुती थोरे, बाबा भातागळीकर, रमेश दनशेट्टी यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विजय स्वामी यांनी केले तर आभार अजित चौधरी यांनी मानले. यावेळी सभेसाठी विविध गावातील शिवसैनिक, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तलावात बुडून तरुणाचा मृत्यू, अग्निशामक पथकाने शव काढून दिले पोलिसांच्या ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील कागजीपूरा येथील तलाव मधे दुपारी एक युवक बुडाल्याचे माहिती मिळताच अग्निशामक रेस्कुय पथकाने घटनास्थळी धाव घेऊन शव काढून पोलिसांच्या ताब्यात दिले. शेख तालीब शेख पाशु, रा.निजामगंज संजयनगर छत्रपती संभाजीनगर हा खुलताबाद तालुक्यातील कागजीपूरा येथील तलावात बुडाला असी माहिती रेस्कुय कॉल द्वारे दि.१६, रोजी अग्निशामक दल पथकला माहिती मिळाली त्या वरुन त्यांनी घटनास्थळी धाव घेऊन कागजीपूरा तलावातून तरुण मयतची शव काढून पोलिसांच्या ताब्यात दिले. या रिस्कुय कामी मुख्य अग्निशामक अधिकारी शिवाजी झनझन यांच्या मार्गदर्शनाखाली स्टेशन अधिकारी आर.के. सुरे, उप अग्निशमन आधिकारी भगत, ड्युटी इंचार्ज हरीभाऊ घुगे, अग्निशामक, दिनेश मुंगसे, प्रसाद शिंदे, विजय कोथमिरे, रितेश कसुरे, वाहनचालक नंदकिशोर घुगे यांनी कर्तव्य बजावले.



# पहूर येथे जय सप्तश्रृंगी माँ निवासिनी ट्रस्टला नवरात्रोत्सवाचा विसर !

## मंदिर शोधून दाखविण्याची संतप्त भाविकांची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**जामनेर :** तालुक्यातील पहूर येथे सध्या सर्वत्र नवरात्रोत्सवाचा जागर सुरू असून दुर्गा मातेच्या उपासनेला बहर आला आहे. देवीची सर्वच मंदिरे विद्युत रोषणाईने सजली असून विविध धार्मिक कार्यक्रमांची मंदिरांमध्ये रेलचेल आहे. पहुर येथील जय सप्तशृंगी मा निवासिनी ट्रस्टला चक्क वरात्रोत्सवाचाच विसर पडला आहे. पहूर कसबे गावातील जय सप्तशृंगी मा निवासिनी ट्रस्टचे क वर्ग दर्जा प्राप्त मंदिरच वरून गायब झाली की काय ? हा प्रश्न पडला असून भाविक संतप्त झाले आहेत.

पहुर कसबे येथे वाघूर नदीच्या तीरावर जय सप्तशृंगी मा निवासिनी



ट्रस्ट स्थापन करण्यात आली असून ग्रामपंचायतच्या नमुना नं ८ वर ट्रस्टच्या अध्यक्षांना मालकी हक्क प्रदान करण्यात आला आहे. पहूर कसबे गावाच्या प्रवेश द्वारा जवळ असलेल्या या ट्रस्टला ग्रामीण तीर्थक्षेत्र विकास योजनेअंतर्गत 'क ' दर्जा प्राप्त झालेला आहे. परंतु येथे कुठलेही मंदिर नसताना ट्रस्टला 'क 'वर्ग दर्जा मिळाला कसा ? क दर्जा प्राप्त ट्रस्टला नवरात्रोत्सवाचा विसर का पडला. आज अक्षरशः या मंदिराच्या जागेवर उकिरडा साचला आहे घाणीचे साम्राज्य सर्वत्र पसरले आहे. यामुळे देवी भक्तांच्या भावना संतप्त झाल्या असून प्रशासनाला मंदिर शोधून दाखविण्याचे संतप्त मागणी भाविकांमधून केली जात आहे. मंदिर अस्तित्वात नसताना क वर्ग दर्जा प्राप्त झाला कसा ? केवळ शासकिय अनुदान आणि योजना लाटण्या साठीच ट्रस्ट स्थापन केली का ? हजारो भाविक मंदिरात दर्शनाला येतात असे धादांत खोटे दाखले कोणी दिले ? 'क 'दर्जा देण्यासाठी जबाबदार असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर प्रशासन काय कारवाई करणार याकडे जनतेसह भाविकांचे लक्ष लागून आहे.

# पीकविमा मिळाल्याने विजयादशमी झाली गोड

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** सावळदबारा, फर्दापूर, बनोटी व सोयगाव तालुक्यातील शेतकऱ्यांना शुक्रवारी पहाटेपासून अचानक खाल्यावर रक्कम जमा झाल्याचे मेसेज आले. त्यामुळे ही रक्कम नक्की कोणती या संभ्रमात शेतकरी होते. त्यामुळे अनेकांनी बँकेत धाव घेतली. तेव्हा बँकेत गेल्यावर वर्ष २०२२ मधील खरीप पिकांच्या पीकविम्याची प्रलंबित अंतिम रक्कम शेतकऱ्यांची जमा झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला. ऐन नवरात्रोत्सवामध्ये आर्थिक अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला. तालुक्यात व सावळदबारा परिसरात खरीप हंगाम २०२२ मधील पिकविम्याच्या अंतिम रकमेच्या हप्ता प्रलंबित राहिला होता. या रकमेसाठी शेतकऱ्यांनी अनेकदा शासन दरबारी पाठपुरावा केला होता. मात्र पीकविमा कंपनीच्या जाचक अटींमुळे शेतकऱ्यांना या रकमेचा विसर पडला होता.अखेरीस प्रशासनाने या पिकविम्याच्या रकमेसाठी शासनस्तरावर पाठपुरावा केला. अखेर पीकविमा कंपनीला ही रक्कम शेतकऱ्यांना अदा करावीच लागली. दरम्यान कंपनीच्या वतीने सोयगाव तालुक्यातील पात्र शेतकन्यांना थेट खात्यात पीकविम्याची रक्कम वर्ग केली. सोयगाव तालुक्यात पीकविमा २०२२ मधील प्रलंबित रक्कम जमा होणाऱ्या शेतकन्यांची आकडेवारी रात्री उशिरापर्यंत तालुका प्रशासनाकडे अप्राप्त होतो. परंतु सर्वच पात्र शेतकऱ्यांना रक्कमेचा संदेश मोबाईल वर प्राप्त झाला आहे. याबाबत तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी, जिल्ह्यातील पीकविम्यासाठी प्राप्त शेतकऱ्यांना प्रलंबित रकमेची आकडेवारी ९५ कोटी इतकी असून सोयगाव तालुक्यातील शेतकन्यांच्या खात्यावर टप्प्याटप्प्याने ही रक्कम जमा होत आहे. त्याची आकडेवारी रात्री उशिरापर्यंत प्राप्त होऊ शकली नाही, असे ही तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया यांनी सांगितले.

# सत्यशोधक निबंध स्पर्धेचे आयोजन

आधुनिक केसरी न्यूज

**सुशिल गायकवाड**

**लोणंद :** सत्यशोधक बहुउद्देशिय सामाजिक संस्था मांडकी (ता.पुरंदर) यांच्या वतीने राज्यस्तरीय सत्यशोधक निबंध स्पर्धा-२०२३ चे आयोजन करण्यात आलेले आहे. १) मी भारतीय संविधान बोलतोय २) भारतीय संविधानिक हक्क, अधिकार व जागृत नागरिकांची कर्तव्ये,जबाबदारी या दोन विषयांवर आधारित ही स्पर्धा घेण्यात आलेली आहे.या स्पर्धेत सर्वांनी सहभागी होण्याचे आवाहन सत्यशोधक बहुउद्देशिय सामाजिक संस्थेचे अध्यक्ष विशाल धेंडे यांनी केलेले आहे.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी खूप मोठया कष्टाने संविधानातून आपल्याला हक्क आणि अधिकार दिलेले आहेत. ते हक्क आणि अधिकार काय आहेत. हे लोकांना कळणे गरजेचे आहेत.इथल्या नागरिकांना आणि विद्यार्थ्यांनासुद्धा हे माहीत असणे गरजेचे आहेत. जोपर्यत संविधान राहील तोपर्यंत आपले हक्क आणि अधिकार अबाधित राहणार आहेत. त्यामुळे संविधानाची जनजगृती करण्यासाठी संविधान दिनाच्या अनुषंगाने संविधाना वर आधारित मी भारतीय संविधान बोलतोय, भारतीय संविधानिक हक्क, अधिकार व जागृत नागरिकांची कर्तव्ये, जबाबदारी हे विषय देऊन हे स्पर्धेचे नियोजन करण्यात आलेले आहे. ही स्पर्धा लहान गट आणि मोठा गट असे दोन गटात होणार असून लहान गट हा वय वर्ष १० ते १८ वर्ष पर्यंतचा असेल.या गटातून स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ५०/-रुपये शुल्क असणार आहे. प्रथम द्वितीय आणि तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे २०००/- रुपये, १५००/- रुपये आणि १०००/- रुपये आदी बक्षीसे असणार आहेत. निबंध लिहिण्याची शब्दमर्यादा ५०० इतकी असणार आहे. तसेच मोठा गट हा १८ वर्षाच्या पुढील असेल. या गटातून स्पर्धेत सहभागी होण्यासाठी १००/- रुपये शुल्क असणार आहे. प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकासाठी अनुक्रमे २०००/- रुपये, १५००/- रुपये आणि १०००/- रुपये आदी बक्षीसे असणार आहेत.

निबंध लिहिण्याची शब्दमर्यादा १००० इतकी असणार आहे. सर्व विजेत्यांना बक्षीसाची रक्कम, सन्मानचिन्ह आणि प्रशस्तीपत्रक देण्यात येणार आहे. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ११०९, सत्यशोधक, राष्ट्रपिता जोतीराव फुले नगर, मु.पो.- मांडकी, ता. पुरंदर, जि. पुणे, महाराष्ट्र, पिन - ४१२३०५ या पत्त्यावर दि.१५ नोव्हेंबर २०२३ पर्यंत निबंध पाठवावेत.अधिक माहितीसाठी विशाल धेंडे-९८५०९५९४०१, राहुल गायकवाड-७७२०८६२८९६ या क्रमांकावर संपर्क साधण्यास सांगितलेले आहे. या स्पर्धेची घोषणा केल्या पासून महाराष्ट्रातील विविध भागातून जवळपास फोन येऊ लागलेले असून लोकांनी या स्पर्धेबाबत सविस्तर माहिती जाणून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे. शिवाय स्पर्धेत सहभागी होणार असल्याचे सांगितलेले आहे. या स्पर्धेतून जास्तीत जास्त सहभाग पाहायला मिळेल असा विश्वास विशाल धेंडे यांनी व्यक्त केला आहे.

# बुलडाणा जिल्हा कोरडा दुष्काळ जाहीर करा व शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या

आधुनिक केसरी न्यूज

**यासीन शेख**

**लोणार :** दिनांक १६ ऑक्टोबर रोजी बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे जिल्हाध्यक्ष तथा माजी आमदार राहुल बोंद्रे यांच्या आदेशाने लोणार तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष राजेश मापारी व शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष शेख समद शेख अहमद यांनी शेतकऱ्यांच्या सोयाबीनला आर्थिक मदत घोषित करा व बुलढाणा जिल्हा कोरडा दुष्काळ म्हणून जाहीर करा तसेच सोयाबीनच्या विविध प्रश्नाबाबत आज लोणार तहसीलचे तहसीलदार गिरीश जोशी यांना निवेदन देण्यात आले. बुलडाणा जिल्ह्यात कोरडा दुष्काळ पडलेला आहे पाऊस अतिशय कमी झाल्याने शेतक-यांना हमखास साथ देणारे सोयबीनचे नगदी पिक हातुन निघुन गेले आहे. रिमझिम पावसात शेतक-यांनी पेरणी केली. पण ऑगस्ट महिन्यात मोठा खंड पडल्याने पिकाच्या वाढीवर परिणाम झाला.एलो मोझक नावाच्या व्हायरसमुळे खोडआळीचा प्रार्दुभाव वाढला. त्यामुळे सोयबीन पिकाची वाटच लागली. आज शेतकरी सोयाबीनची मळणी करत असतांना झडतीचं प्रमाण ३० ते ४० टक्के आहे. उडीद, मुग, ज्वारी, बाजरी, ही पिके कुठेच दिसत नाही. त्यामुळे या



नुकसानग्रस्त शेतक-यांमध्ये चिंता वाढली आहे तर अनेकांचा सोयबीन पिकांचा खर्च निघणेही अवघड आहे.

तरी बुलडाणा जिल्हा दुष्काळ जाहीर करून पिक विम्याची हक्काची रक्कम व नुकसान भरपाईची मदत तातडीने देण्यात यावी, अन्यथा काँग्रेस पक्षाच्या वतीने आक्रमकपणे जिल्हाभर जेलभरो, रास्तारोको करण्यात येईल. सत्ताधा-यांना रस्त्यावर फिरू दिल्या जाणार नाही. असे निवेदन देण्यात आले. यावेळी बुलढाणा जिल्हा काँग्रेस कमिटीचे माजी कोषाध्यक्ष शांतीलालजी गुगलीया, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते साहेबराव पाटोळे, गटनेतेभूषण मापारी,बुलढाणा जिल्हा युवक काँग्रेसचे अध्यक्ष अनिकेत मापारी काँग्रेसचे ज्येष्ठ प्रदीप संचेती, अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष तोफिक कुरेशी, नगरसेवक संतोष मापारी,नितीन शिंदे,ओबीसी सेल शहराध्यक्ष अंबादास इंगळे,रामचंद्र कोचर,युवक काँग्रेस शहराध्यक्ष विकास मोरे,शहर उपाध्यक्ष गजानन मापारी, माजी नगरसेवक शंकर हेंद्रे, सचिव गौरव धुमाळ,महिला अध्यक्ष सौ. ज्योती राठोड, असंघटित सेलचे शहराध्यक्ष शेख अफसर शेख तुराब, प्रकाश चव्हाण,मुमताज भाई, काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.



# महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूलचे क्रीडा स्पर्धेत यश

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील दरेगाव येथे महाराजा सयाजीराव गायकवाड हायस्कूल व ज्युनिअर कॉलेज दरेगाव या शाळेतील विद्यार्थिनी कुमारी पूनम राजीव गायकवाड या विद्यार्थिनी औरंगाबाद जिला क्रीडा कार्यालयाने आयोजित केलेल्या शंभर मीटर धावण्यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला असून पुनम हिचे कौतुक सर्वच स्तरातून होत आहे. कुमारी पूनम हिस शाळेतील शिक्षक किरण ताकटे यांचे मार्गदर्शन लाभले असून शाळेतील इतर शिक्षक मुख्याध्यापक यांचेही मोलाचे सहकार्य लाभले आहे, तिच्या या विजयामुळे संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉक्टर संजय गायकवाड संस्थेच्या सचिव प्रा. शांता भोसले संस्थेची उपाध्यक्ष दिगंबर गाडेकर तसेच संस्थेतील सर्वच मान्यवर तसेच दरेगावचे सरपंच संदीप गायकवाड उपसरपंच आजिनाथ खंडागळे तसेच दरेगाव ग्रामपंचायत सदस्य सोसायटीचे चेअरमन विलास दादा गायकवाड तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक या सर्वांनी तिचे कौतुक व अभिनंदन केले आहे. तिच्या या विजयामुळे शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी शाळेचे मुख्याध्यापक प्रकाश वेताळ तसेच शाळेतील सर्व शिक्षक या विजयामुळे भारावून गेलेले आहेत. आता आम्हीही येणाऱ्या सर्व स्पर्धांमध्ये भाग घेऊन पूनम सारखाच विजय मिळवण्याचा प्रयत्न करू अशी याप्रसंगी मुलांनी भावना व्यक्त केल्या.





# बालविवाहमुक्त भारत अभियानांतर्गत 35,000 मुलांनी घेतली बालविवाह प्रतिबंधक कायद्याची शपथ

आधुनिक केसरी न्यूज

**छत्रपती संभाजीनगर :** 16 ऑक्टोबर रोजी कैलास सत्यार्थी चिल्ड्रन फाउंडेशन नई दिल्ली व उत्कर्ष बहुउद्देशीय सेवाभावी संस्था छत्रपती संभाजीनगर आयोजित 16ऑक्टोबर 2023 च्या बालविवाह मुक्त भारत अभियान अंतर्गत शालेय विद्यार्थ्यांना बालविवाह शपथ कार्यक्रम व रात्री 50 ग्रामपंचायती सोबत कॅन्डल मार्च फुलंब्री तालुक्यातील सर्व प्राथमिक शाळा व हायस्कूल येथे नियोजन करण्यात आलेले होते. सदरील कार्यक्रमास माननीय गटशिक्षणाधिकारी राजेश महाजन साहेब गटविकास अधिकारी पंचायत समिती फुलंब्री, सहाय्यक गटविकास अधिकारी, विनायक राठोड सर, व्ही.एस. काथार सर उमेद अभियानाचे तालुका व्यवस्थापक यांची विशेष उपस्थिती होती, तसेच कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक, शिक्षक वृंद यांना मोलाचे सहकार्य केले. आदरणीय प्रेरणास्थान नोबेल पुरस्कार विजेते कैलास सत्यार्थी मार्गदर्शनाखाली ऊर्जा स्थान विधान सर राजू जी भारद्वाज सर यांच्या मार्गदर्शनाखाली नियोजन करण्यात आले होते. तसेच फुलंब्री तालुक्यातील 50 गावात संस्थेच्या वतीने जन जागृति कँडल मार्च बाल विवाह शपथ कार्यक्रम, विविध स्पर्धा इत्यादींचे आयोजन करण्यात आले होते. हे बाल विवाह मुक्त भारत अभियान संपूर्ण भारतामधे वेगवेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन नियोजन करण्यात येणार आहे. आयोजक ज्ञानेश्वर हनवते अध्यक्ष उत्कर्ष बहुद्देशीय सेवाभावी संस्था, कार्यक्रम व्यवस्थापक प्रविण खंडारे, औरंगाबाद ग्रामपंचायत सरपंच, सदस्य, समाजसेवक भजनी मंडळी, महिला उमेद अभियानाचे गटप्रवर्तक गाव पातळीवरील बचत गटाच्या अध्यक्ष सदस्य अंगणवाडी सेविका मदतनीस समस्त गावकरी उपस्थित होते.

# सशक्त युवापिढीसाठी 'नशामुक्त पहाट', यवतमाळ पोलिसांचा उपक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**यवतमाळ :** व्यसनांनी कुटुंबाची वाताहत होते. तरुण पिढी विविध व्यसनांच्या आहारी जात असल्याने त्यांचे जीवन उध्वस्त होत आहे. त्यामुळे तरुणांना व्यसनांपासून परावृत्त करून सशक्त युवापिढी घडविण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. पवन बन्सोड यांच्या संकल्पनेतून यवतमाळ जिल्ह्यात 'नशामुक्त पहाट' अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियानांतर्गत जिल्ह्यातील शाळा, महाविद्यालयात चित्रफितीसह पथनाट्यातून जनजागृती करण्यात येणार आहे. मेंदूला बधीर करणाऱ्या मादक पदार्थाच्या अतिरेकी सेवनात युवापिढी अडकली आहे. या व्यक्ती स्वतःच्या हातानेच घात करून घेत आहे. फक्त इच्छाशक्तीच्या बळावर व्यसनातून सुटका होऊ शकते. ही इच्छाशक्ती तयार करण्यासाठी योग्य प्रयत्नांची जोड व मार्गदर्शन मिळणेही आवश्यक आहे.

# शहरातील सुविधांच्या अभावामुळे नागरिक त्रस्त; आंदोलनाचा इशारा

आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** महापालिकेच्या वार्ड क्रमांक ४ अंतर्गत नाईक नगर, सुंदर नगर, समर्थ नगर व पोर्णिमा नगरासह अनेक नगरांचा समावेश आहे. या नगरातील बहुसंख्य मालमत्ता धारक नियमित कर धारक असून दिर्घ काळापासून सर्व प्रकारच्या मुलभूत सोयी सुविधा पासून वंचित आहेत. उदा. या नगरातील नागरीकांना नियमित स्वच्छ पाणी मिळत नाही. तसेच अंतर्गत रस्ते , ड्रेनेज तुटपुंजी स्वच्छ्ता व्यवस्था, अकृषिक कराचा बोजा सारख्या समस्यांना नेहमीच तोंड द्यावे लागते. सदर नगरातील बहुसंख्य नागरिकांनी नगरसेवकासह मनपा प्रशासनाला प्रत्यक्ष भेटीगाठी घेऊन व निवेदने देऊन अवगत केलेले आहे तरी अकार्यक्षम व बेजबाबदार मनपा प्रशासनाने कुठलीही दखल घेतली नाही. म्हणाव्या तश्या दर्जेदार सोई सुविधा उपलब्ध नसताना ही दुपटीने करात वाढ करुन कराचे ओझे मात्र नागरीकांच्या माथी मारल्या जाते म्हणून मनप प्रशासना विरोधात नागरिकांत तीव्र असंतोष आहे. जाचक करवाढीतून नागरिकांची मुक्ती व्हावी व दर्जेदार सोई सुविधा पुरवाव्यात म्हणून " जागो मनपा प्रशासन जागो ", "काम है तो दाम है वरणा, मनप का क्या काम है " म्हणून आंदोलन करणार आहेत. वेळीच मनपा प्रशासनाने नागरीकांच्या अडचणींची नोंद घेऊन ठोस उपाययोजना कराव्यात अन्यथा शहरातील नागरिक मनपा कार्यालयासमोर तीव्र आंदोलन करणार.

शहर विकासाप्रती मनपा प्रशासनाला जाब विचारण्यास्तव इतर नागरी संघटनासह लोक विकास समन्वय संघर्ष समितीनेही या आंदोलनाला आपला पाठिंबा दर्शवला आहे, असे दीपक आडगावकर, दीपक कसबे ॲड. धोंडिबा पवार, बंडोपंत कुंटुरकर, कॉ. विजय गाभणे, प्रा. लक्ष्मण शिंदे, के.के. जांबकर, सोपान मारकवाड, बालाजी पवार, ज्ञानेश्वर राप्ते , सुरेश पाटील, शेख हैदर मुहंमद हाजीसह इतर नागरीक कळवतात.

# साई पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजची मैदानी स्पर्धेत चमकदार कामगिरी

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** तालुक्यातील बाजार सावंगी येथे दिनांक 12 व 13 ऑक्टोबर 2023 रोजी छत्रपती संभाजीनगर येथील विभागीय क्रीडा संकुल येथे झालेल्या जिल्हास्तरीय मैदानी स्पर्धेत थाळीफेक 17 वयोगटात अदिती नलावडे हिने जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावला, तर सोनाली गायकवाड हिने द्वितीय क्रमांक पटकावला, गोळा फेक स्पर्धेत 17 वयोगटात सोनाली गायकवाड हिने जिल्ह्यातुन प्रथम क्रमांक पटकावला. दोन्ही खेळाडूंची मानवत येथे होणाऱ्या विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तसेच पाच किलोमीटर चालणे स्पर्धेत 19 वयोगटात करण घुसिंगे याने जिल्ह्यातुन प्रथम क्रमांक पटकावला तर रवी नलावडे याने द्वितीय क्रमांक पटकावला दोन्ही खेळाडूंची मानवत जिल्हा परभणी येथे होणाऱ्या विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहेत.तसेच माही साबळे हिने 400 मीटर अडथळ्याच्या शर्यतीमध्ये जिल्ह्यातुन द्वितीय क्रमांक पटकावला तिची देखील विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहेत. तसेच तीन किलोमीटर चालणे 19 वयोगटात गायत्री तांदळे हिणे तृतीय क्रमांक पटकावला. खेळाडूंच्या यशाबद्दल संस्था अध्यक्ष किशोर पाटील नलावडे तसेच ज्ञानेश्वर नलावडे, संदीप जैस्वाल, अकिल शेख, प्राचार्य गोपाल अधाने, उपप्राचार्य गिरधर जाधव, प्राध्यापक अतुल जाधव, रामेश्वर मते, ज्ञानेश्वर अधाने, ज्ञानेश्वर नलावडे, संदीप चव्हाण,अक्षय गोसावी,सौरभ दहातोंडे, प्राध्यापिका ज्योती वायसळ, शितल नलावडे, साक्षी जैस्वाल, वर्षा लोंढे, कालिंदा जंजाळ, रिना जैस्वाल, रेणुका देवकर, जयश्री भांगरे, कल्पना नलावडे, राज्यश्री राणे यांनी सर्व खेळाडूंचे अभिनंदन करून, विभागीयस्तरीय मानवत जिल्हा परभणी येथे होणाऱ्या स्पर्धेसाठी सर्वांना शुभेच्छा दिल्या.




गुप्तरोगाबाबत काहीही लपवू नका

(रविवारी मोफत तपासणी)

डॉ. शेख ए.एच.
या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.
नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर घर संसार

किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही
सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर

# चंद्रपुरात ६७ वा धम्मचक्र प्रवर्तनदिन उत्साहात साजरा

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** शिस्तबद्ध मिरवणूक, मिरवणूकितील तरुणाईचा उल्लेखनीय सहभाग, महिलांच्या ढोलताशा पथकाने वेधलेलं लक्ष , लाठीकाठी चे प्रात्यक्षिक, अतिशय सुंदर पद्धतीने सजवलेला अस्थिकलशाचा रथ, ठेक्यावर जय भिम चे सुरु असलेले नारे, समता सैनिक दलाचे उत्तम संचालन अशा विविध गोष्टींनी शहराच्या मध्यभागी असलेल्या डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून निघालेली मिरवणूक ही चंद्रपूरकरांच लक्ष वेधून घेत होती.

६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्याने शहरात भव्य मिरवणूक काढण्यात आली. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून निघालेली ही मिरवणूक स्थानिक दिक्षाभुमि येथे पोहचल्या नंतर हजारोंच्या संख्येत असलेल्या भिमसागराने जय भिमचा नारा देत अस्थिकलशास नमन केले.

१९५६ मधे नागपूर नंतर बाबासाहेब आंबेडकर यांनी चंद्रपूर येथे हजारो अनुयायांना दिक्षा दिली होती. येथिल दिक्षाभुमीला बाबासाहेब आंबेडकर यांचा चरण स्पर्श झाला तीच ही चंद्रपूर येथील दीक्षाभूमी. १५ व १६ आक्टोंबर ला चंद्रपूर येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन उत्साहात साजरा करण्यात येतो.

या धम्मचक्र प्रवर्तन दिनाला हजारो अनुयायांची उपस्थिती असते. दिक्षाभुमिवर नमन करण्यासाठी जनसागर उसळलेला असतो. या जनसागरास दोन दिवस विविध बौद्धिक व सांस्कृतिक मेजवानी मिळत असते.

दीक्षाभूमी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर मेमोरियल सोसायटी चे अध्यक्ष अरुण घोटेकर यांच्या नेतृत्वात काढण्यात आलेली मिरवणूकीची सांगता करत भदन्त आर्य नागार्जून सुरेई ससाई यांच्या हस्ते बाबासाहेब आंबेडकर यांचा अस्थिकलशास जनतेच्या दर्शनासाठी ठेवण्यात आला. बुद्धवंदना व धम्मप्रवचन करण्यात आले. यावेळी भदन्त नागसेन, भदन्त धम्मबोधी, भदन्त धम्मविजय, भदन्त कश्यप,



भदन्त धम्मप्रकाश संस्थेचे अध्यक्ष अरुण घटेकर, उपाध्यक्ष अशोक घोटेकर मारोतराव खोब्रागडे, वामनराव मोडक, कुणाल घोटेकर प्राचार्य राजेश दहागावकर आदिंची उपस्थिती होती.

सायंकाळी अध्यक्ष अरुण घोटेकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या मुख्य सोहळ्याला केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले, वन व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार, विरोधी पक्ष नेते विजय वडेट्टीवार, आमदार सुधाकर अडबाले, सुभाष धोटे, किशोर जोरगेवार, प्रतिभा धानोरकर, गोंडवाना विद्यापीठ कुलगुरु डॉ. प्रशांत बोकारे, कुलसचिव डॉ. अनिल हिरेखण, शिवानी वडेट्टीवार, वामनराव मोडक आदि मान्यवरांची उपस्थिती होती. चंद्रपूरातील दिक्षाभुमिच्या विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध असून त्या दृष्टीकोनातून आवश्यक ती सर्व उपाययोजना व कामे सुरु आहेत अशी ग्वाही उपस्थिती सर्व मान्यवरांनी दिली.

या धम्मचक्र प्रवर्तन दिन सोहळ्याच्या निमित्ताने परिसरात पुस्तकांचे अनेक स्टॉल लावण्यात आले होते. या स्टॉलवर तरुणाईची गर्दी लक्ष वेधून घेत होती. या सोहळ्यासाठी आलेल्या हजारो बांधवांची गैरसोय होऊ नये म्हणून भोजन, नाश्ता, चहा, शितपेय, पाणी यांचे असंख्य स्टॉल देखील या परिसरात लावण्यात आले होते. पोलिसांच्या चोख बंदोबस्ताने हा सोहळा अतिशय शांततेत व उत्साहात पार पडला.

# स्वच्छतेसाठी सगळ्यांनी एकत्र या : सतीश गायकवाड

## तरडगाव येथे शिवप्रेमी नवरात्र उत्सवातून आवाहन

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** प्रत्येकाने आपला परिसर, आपलं आंगण, आपला गांव, आपला तालुका स्वच्छ जर करत गेलं तर फार स्वच्छता होईल. पंढरपूर पर्यंत जाण्याचा हाच उद्देश होता की, समाजामध्ये एक चांगला देखील संदेश जावा की अशा पद्धतीने तुम्ही शासनाच्या जीवावर सगळं अवलंबून राहू नका. शासन आपलंच आहे. परंतु आपण शासनाच्या उपयोगी पडलो तर शासन आपल्या उपयोगी पडेल. त्याच पद्धतीने आपण काही तरी उपक्रम राबवावे. सीमेवर असलेला सैनिक हा स्वतःच्या गावापुरता किंवा जिल्हा पुरता सीमा सांभाळत नसतो तर तो सगळ्यांचं रक्षण करत असतो. स्वच्छतेचा संदेश महाराष्ट्रात घेऊन जाण्यासाठी आम्ही ही काम करण्याचे ठरविले आहे. सगळ्यांनी एकत्र या,प्रॅक्टिकली सहभाग झाला पाहिजे, असे प्रतिपादन माऊली सेवा दलाचे सतिश गायकवाड यांनी केले.

नवरात्रोत्सवानिमित्त श्री संत माऊली सेवा दलाच्या वतीने तरडगाव, ता. फलटण येथे दि.१४ ऑक्टोबर रोजी सप्तश्रुंगी नवरात्रोत्सव मंडळ, शिवप्रेमी नवरात्र उत्सव मंडळ, श्री विठ्ठल मंदिर परिसर, श्री ज्योतिर्लिंग मंदीर परिसर, ग्रामपंचायत परिसर, श्री वैष्णोदेवी नवरात्रोत्सव मंडळ,जयवीर तरुण मंडळ, श्रीराम मंदिर आदी परिसरातून स्वच्छता मोहीम राबविण्यात आली होती. या सेवेबद्दल शिवप्रेमी नवरात्र उत्सव मंडळाच्या वतीने माऊली सेवा दलाचा विशेष सत्कार करण्यात आला. शिवप्रेमी नवरात्र उत्सव मंडळ येथे  दुर्गादेवीची आरती संपन्न झाल्यानंतर सतिश गायकवाड यांनी मनोगत व्यक्त करताना सर्वांनी एकत्र येण्याची अपेक्षा व्यक्त केली. यावेळी आमदार दीपकराव चव्हाण, माजी सभापती वसंतराव गायकवाड,सरपंच जयश्री चव्हाण, उपसरपंच प्रशांत गायकवाड, सोसायटीचे चेअरमन विजय गायकवाड, व्हाईस चेअरमन महावीर शहा,डॉ.अनिल कदम, ग्रामपंचायत सदस्या हेमा गायकवाड,सदस्या विद्या पवार आदींसह इतर मान्यवर व भाविक उपस्थित होते.

सतिश गायकवाड म्हणाले की, स्वच्छता मोहिमेसाठी लोकांचा उत्स्फूर्तपणे सहभाग आहे. स्वच्छतेचा विचार लोकांपर्यंत मांडला.माऊली सेवा दलाच्या माध्यमातून हा उपक्रम चालू करण्यात आला. तरडगावच्या विविध भागात स्वच्छता मोहीम राबविली. आम्ही पंढरपूरच्या विठ्ठल मंदिराची सेवा केली. खूप सुंदर अशी सेवा केली. विठ्ठल मंदिर समितीच्या लोकांकडून ही आम्हाला चांगली सेवा देण्यात आली. आपल्या गावची संस्कृती पंढरपूरपर्यंत पोहचविलेली आहे.स्वच्छता अभियानचा अभ्यास म्हणून आम्ही बालाजीला निघालेलो आहे. आपण आपल्या गावची संस्कृती टिकवत आहे. आपल्या गावचं नाव राज्यपातळीवर नेहण्याची आमची तयारी आहे. परंतु आम्ही आता सध्या विचार करतोय की जिल्हा पातळीवर तरी आपलं नांव जावं, असे सतिश गायकवाड यांनी म्हटले.

ते पुढे म्हणाले की, व्यसनमुक्ती व्हावी असं सांगितल जातं. परंतु ते स्वतःपासून अंमलात आणण्यासाठी कितपत प्रयत्न होत असतात. आमच्या उपक्रमातून पाच जणांनी व्यसनमुक्त होण्याची शपथ घेतली आहे. स्वच्छता उपक्रमातून विचारांची स्वच्छता झाली आहे.वैचारीक प्रगती झाली तर आपल्याला कुठेही काही कमी पडणार नाही. आज आपोआप प्रगती होईल. शिवप्रेमी नवरात्र उत्सव मंडळाने जो सत्कार घेतला, पाठीवर यशस्वी थाप मारली,त्यामुळे जास्तीत जास्त आभार मानतो.सेवाभावी लोकांच्या कामामुळे जो सत्कार झाला.तो सर्व सेवकांचा सत्कार आहे. जण स्वतःहुन आणि निःस्वार्थी भावनेने काम करत असतात.असे सतिश गायकवाड यांनी सर्व सेवकांबद्दल म्हटले.





# वाचन-लेखनाने कलमांचा आदर्श ठेवा! : प्राचार्य डॉ.वसंत सातपुते

आधुनिक केसरी न्यूज

**सोनपेठ :** येथील कै.रमेश वरपूडकर महाविद्यालयामध्ये मिसाईल मॅन डॉ.ए.पी. जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त इंग्रजी विभागाच्या वतीने डॉ.कलामांची जयंती वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वसंत सातपुते सर, तर हनुमान शिक्षण प्रसारक मंडळाचे सदस्य मा.श्री रामेश्वर कदम हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

याप्रसंगी इंग्रजी विभागाच्या विद्यार्थ्यांनी बनवलेले "दि मिसाईल मॅन" या भित्तीपत्रकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंग्रजी विभागाचे प्रा. डॉ.विठ्ठल जायभाये यांनी केले. कलाम हे युवकांचे प्रेरणास्थान असून त्यांचे कार्य आपण नित्य स्मरणात ठेवावे असे डॉ.जायभाये म्हणाले. त्याचबरोबर प्राचार्य डॉ.सातपुते सरांनी डॉ.कलाम हे कृतिशील शास्त्रज्ञ होते. त्यांनी आपल्या लेखनातून आणि भाषणातून सातत्याने समाजाचे आणि युवकांचे प्रबोधन केले. त्यासाठी युवकांनी डॉ.कलामांचे वाचन आणि लेखन करून जीवन समृद्ध बनवावे असे प्रतिपादन केले. याप्रसंगी अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे डॉ.एम.बी.पाटील, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.आंधळे सर, डॉ.फाजगे सर, डॉ.सोमवंशी मॅम, डॉ.वाकणकर सर, डॉ.कुलकर्णी मॅम, कनिष्ट महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.शेख शकीला मॅम आदी मान्यवर उपस्थित होते. याप्रसंगी कु.वैष्णवी पाटील, कु.राधिका विटकर, कु.रुकसार शेख आदी विद्यार्थिनींनी आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंग्रजी विभागाचे प्रा. दिलीप कोरडे यांनी तर कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन कु.पूजा रोडे हिने मानले. शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# प्रदीप पाटील यांना डॉ. अब्दुल कलामांचा राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार

आधुनिक केसरी न्यूज

**संभाजीनगर :** भारताचे माजी  राष्ट्रपती, भारतरत्न, मिसाईल मेन डॉ.ए. पी.जे. अब्दुल कलाम सरांच्या ९२ व्या जयंती निमित्त ड्रीम फाऊंडेशन, करुणा ग्रंथवाचक मंडळ व अनुप्रास बहुउद्देशीय शिक्षण संस्था छत्रपती संभाजी नगर यांच्या संयुक्त विद्यमाने देण्यात येणारा राज्यस्तरीय डॉ.कलाम राष्ट्र उभारणी प्रेरणा पुरस्कार २०२३ साठी जळगाव येथील श्री प्रदिप गोकुळ पाटील सामाजिक कार्यकर्ते  यांची निवड करण्यात आली होती. प्रदिप पाटील व त्यांची पत्नीवर्षा पाटील हे मागील अनेक वर्षापासून शैक्षणिक, सामाजिक, युवा जागृती, महिला सक्षमीकरण, आधुनिक शेती, पर्यावरण व साक्षरता यासह राष्ट्रीय मूल्य लोकांमध्ये रुजविण्यासाठी कार्य करीत आहेत. त्यांच्या या विधायक कार्याची दखल घेऊन निवड समितीने त्यांची राज्यस्तरीय गौरवासाठी निवड केली होती. रविवार दि १५ ऑक्टोबर रोजी डॉ.अब्दुल कलाम साहेबांच्या जयंती दिनी सकाळी ११:०० वा. छत्रपती संभाजी नगर येथे वाणी कम्युनिटी हॉल, शिवाजीनगर येथे अशोक नगरकर - वरिष्ठ  वैज्ञानिक, राजेंद्र वाणी - सामाजिक कार्यकर्ते, मा. अजाबराव मनकर - शिक्षणतज्ञ , मा.अंकिता देगील - युवा शास्त्रज्ञ, शिवाजी वालेकर - यशोदिप करीयर अकॉडेमी, काशिनाथ भतगुणकी लेखक व प्रेरक वक्ते ( डॉ.अब्दुल कलाम सरांची भेट घेऊन व्हिजनसाठी संपूर्ण भारतभर सायकल प्रवास करणारे) यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य पुरस्कार वितरण सोहळा पार पडला. या सोहळ्यात प्रदिप पाटील यांच्या परिवाराला सन्मानचिन्ह, सन्मानपत्र, श्रीफळ मानाचा फेटा व डॉ.अब्दुल कलाम यांची ग्रंथे देऊन  गौरव करण्यात आला.

पुरस्कार मिळाल्या बद्दलप्रदिप पाटील व त्यांची पत्नी वर्षा पाटील यांचा समाजात चौहीकडे कौतुक होत आहे.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
• जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
• आम वात उदर रोग
• दमा व ॲलर्जी (जुनाट)
• चिकन गुनिया
• मनोकयीईक आजार
• त्वचा व गुप्त रोग
• स्त्रीयांचे आजार
• स्थूलपणा, मूळव्याध
• वंध्यत्व, संतती प्राप्ती
• कॅन्सर सल्ला, मुतखडा
• वजन वाढविणे
• वजन कमी करणे
• केसांच्या सर्व तक्रारी
• लहान मुलांची
• स्मरणशक्ती वाढविणे
पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन

अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद